cmyk

## संपादकीय

### व्याजदर, महागाई आणि बाजाराचा नवा गणिती खेळ!

६ जून २०२६ रोजी अमेरिकेच्या शेअर बाजारात झालेली मोठी घसरण जागतिक गुंतवणूकदारांसाठी धोक्याची घंटा ठरली. तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश असलेल्या नॅस्डॅक निर्देशांकात एका दिवसात ४ टक्क्यांहून अधिक घसरण झाली, तर एस अँड पी ५०० निर्देशांक २.६ टक्क्यांनी आणि डाऊ जोन्स इंडस्ट्रियल ॲव्हरेज १.३५ टक्क्यांनी खाली आला. विशेष म्हणजे ही घसरण कोणत्याही आर्थिक संकटामुळे किंवा युद्धजन्य परिस्थितीमुळे नव्हे

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८० | बुधवार दि.१० जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीपासून वंचित ६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिलासा !

## १४०० कोटींच्या मदतीस मंत्रिमंडळाची मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनांसाठी पात्र ठरूनही विविध तांत्रिक अडचणी, कागदपत्रांतील त्रुटी आणि प्रशासकीय कारणांमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या लाखो शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अशा शेतकऱ्यांसाठी सुमारे १४०० कोटी रुपयांच्या कर्जमाफीला मंजुरी देण्यात आली.**



राज्यात यापूर्वी महायुती सरकारच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना तसेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली होती. या दोन्ही योजनांमधून लाखो शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला. मात्र, आधार क्रमांक पडताळणी, बँक खात्यांमधील विसंगती, जमीन अभिलेखांची अपूर्ण माहिती, तांत्रिक त्रुटी आणि अन्य प्रशासकीय कारणांमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिले होते. सरकारच्या नोंदीनुसार अशा शेतकऱ्यांची संख्या सहा लाखांपेक्षा अधिक आहे. गेल्या काही वर्षांपासून विविध शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी आणि विरोधी पक्षांकडून ▶▶ पान २ वर

# मोदी मंत्रिमंडळात बदलाचे वारे!

## राज्यसभा निवडणुकांनंतर मोठ्या फेरबदलाचे संकेत

दिल्ली । वृतसंस्था

**१८ जून रोजी होणाऱ्या राज्यसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होण्याची चर्चा जोर धरत आहे. यावेळी अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची शक्यता असून जवळपास डझनभर मंत्र्यांवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. वृत्तानुसार, आगामी विधानसभा निवडणुकांच्या तयारीत असलेली भाजप नेतृत्वातील सरकार मंत्रिमंडळाबाबत महत्त्वाचे निर्णय घेऊ शकते. सूत्रांच्या माहितीनुसार, किमान दोन कॅबिनेट मंत्री आणि तीन राज्यमंत्री मंत्रिपरिषदेतून बाहेर**



**पडू शकतात. तसेच एका वरिष्ठ मंत्र्याला दक्षिण भारतातील एका राज्यात पक्षाची जबाबदारी दिली जाऊ शकते.**

चर्चेनुसार, नव्या मंत्रिमंडळ विस्तारात जनता दल (युनायटेड), तेलुगू देसम पक्ष (टीडीपी), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (एनसीपी) आणि राष्ट्रीय लोक मोर्चा (आरएलएम) यांसारख्या मित्रपक्षांना प्रतिनिधित्व मिळू शकते. विशेषतः नीतीश कुमार यांच्या जेडीयू आणि चंद्राबाबू नायडू यांच्या टीडीपी यांना अधिक लाभ मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मित्रपक्षांच्या बहुतांश नेत्यांना राज्यमंत्रीपद मिळू शकते. राज्यसभेचा कार्यकाळ पूर्ण होत असलेल्या काही मंत्र्यांना यंदा किंवा २०२७ च्या सुरुवातीला पक्ष संघटनेत पाठवले जाऊ शकते. ७० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या काही राज्यसभा खासदारांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा विचार सुरू असल्याचे सांगितले जात आहे. तसेच भाजपच्या विविध मोर्चातील नेत्यांना प्रथमच केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या ▶▶ पान २ वर

# दादांच्या राष्ट्रवादीत नेमकं चाललय काय

## आता इद्रिस नाईकावडींच्या राजीनाम्याची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सातत्याने नवनवीन राजकीय घडामोडी घडत असून आधी विधानपरिषद, नंतर राज्यसभा आणि आता विद्यमान आमदाराच्या राजीनाम्यामुळे जोरदार चर्चा सुरू आहे. राज्यसभा निवडणुकीत राष्ट्रवादीकडून राजेंद्र जैन यांना संधी देण्यात आल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं. त्यामुळे, ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात असून त्यांच्या बोलण्यातूनही ते जाणवत आहे. त्यातच, आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून आमदार इद्रीस नाईकवाडी यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.



इद्रीस नाईकवाडी यांना आज देवगिरीवर बोलवण्यात आलं होतं, आमदारकीचा राजीनामा द्या, पक्ष भविष्यात तुम्हाला मोठी संधी देईल,असे आश्वासन बैठकीत वरिष्ठांकडून देण्यात आले. मात्र, राजीनामा न देण्यावर इद्रीस नाईकवाडी ठाम असल्याची माहिती आहे. या बैठकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तळेगावमध्ये गॅस गळती; दोन जणांचा मृत्यू

पुणे : मावळ तालुक्यातील तळेगाव एमआयडीसीपरिसरात धक्कादायक घटना घडली आहे. नवलाख उंबरे येथील शॅफ्लर इंडिया कंपनीत कार्बन डायऑक्साइडगॅस गळतीची गंभीर घटना घडली आहे. यामध्ये दोन कामागारांचा मृत्यू झाला आहे. सुरुवातीला गॅस सिलेंडर स्फोटाची माहिती समोर आली होती, मात्र प्राथमिक माहितीनुसार कंपनीत गॅस गळती झाल्याचे स्पष्ट झाले आहे.या दुर्दैवी दुर्घटनेत गणेश उंबरे आणि वैभव थोरात या दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर श्रीकृष्ण साहू, गौरीशंकर शर्मा आणि नरसिंह पाटील हे तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच कंपनी प्रशासन, एमआयडीसी सुरक्षा यंत्रणा आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

### अब्दुल सत्तारांच्या मुलाचा अर्ज बाद

छ. संभाजीनगर ;औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांना मोठा राजकीय धक्का बसला आहे. त्यांचे पुत्र समीर सत्तार यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिका–यांनी बाद ठरवल्याने जिल्ह्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.विधान परिषद निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर अब्दुल सत्तार यांनी जिल्हा बँकेवरील सत्ता कायम राखण्यावर पूर्ण लक्ष केंद्रित केले होते. यासाठी महायुतीतील भाजप आणि शिवसेना यांच्यातील मतभेद मिटवण्याचे प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्तरावरही झाल्याची चर्चा होती. मात्र, या घडामोडींना वेगळे वळण लागले असून समीर सत्तार यांचाच अर्ज बाद झाला आहे.

### मोदींच्या होमपीचवर काँग्रेसला भोपळा

गांधीनगर: गुजरातच्या चार राज्यसभेच्या जागांसाठी भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. विरोधकांकडून एकही उमेदवारी अर्ज भरण्यात आलेला नाही. त्यामुळे भाजपचे चारही उमेदवार बिनविरोध विजयी होतील. त्याबद्दलची औपचारिक घोषणा शिल्लक आहे. हा क्षण भाजपसाठी ऐतिहासिक मानला जात आहे.गुजरात राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच गुजरातमधून राज्यसभेवर काँग्रेसचा एकही खासदार जाणार नाही. त्यामुळे राज्यसभेच्या पातळीवर काँग्रेसमुक्त गुजरात झाल्याचा दावा भाजपचे प्रदेशाध्यक्ष जगदीश विश्वकर्मा यांनी केला. तर यावरुन काँग्रेसनं तिखट प्रतिक्रिया दिली आहे. हा भाजपचा अहंकार असल्याचं प्रत्युत्तर काँग्रेसचे प्रवक्ते मनीष दोशी यांनी दिलं आहे.गुजरातमधून काँग्रेसकडून केवळ शक्तिसिंह गोहिल राज्यसभेवर आहेत. त्यांचा कार्यकाळ संपत आलेला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०९ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६५.५० क्विंटल | २,१५० | २,४०० | २,२८० |
| ज्वारी/हायब्रिड: १११.०० क्विंटल | २,२९१ | ३,९६८ | २,८०६ |
| मका/लोकल: ३०.०० क्विंटल | २,०१८ | २,०१८ | २,०१८ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,८०० | ७,३६१ | ७,१५३ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५३.०० क्विंटल | २,२०० | २,७४५ | २,३५५ |
| मुग: ८.०० क्विंटल | -- | -- | -- |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: १३.५० क्विंटल | ५,५८० | ७,३५८ | ६,८३९ |

# केवळ मतांसाठी योजना; नंतर मात्र कात्री–रोहित पवार

पुणे । प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. उज्ज्वला योजनेतील अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या कमी करण्यात आल्याचा आरोप करत, निवडणुका संपल्यानंतर सरकार योजनांच्या लाभार्थ्यांवर निर्बंध आणत असल्याचा दावा केला आहे.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये उज्ज्वला योजनेअंतर्गत अनुदानित गॅस सिलिंडरची संख्या आधी १२ वरून ९ आणि नंतर ४ करण्यात आल्याचा दावा केला. उद्या ही योजनाच बंद झाली तरी आश्चर्य वाटणार नाही, असा टोला ▶▶ पान २ वर

# मोदींनी १२ वर्षात देशाचे १२ वाजवले!

## ओबीसी डीएनए आहे म्हणणारे मुख्यमंत्री गप्प का ?

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दीर्घ पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाची बरोबरी केली असली, तरी ते नेहरूंची वैचारिक उंची कधीच गाठू शकत नाहीत. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात देशाचे पूर्णपणे १२ वाजले असून जनता महागाई आणि बेरोजगारीसारख्या संकटात सापडली असल्याची टीका केली आहे.सरकार ओबीसींची मते घेते पण त्यांच्यासाठी काहीच काम करत नाही. ओबीसी डीएनए आहे म्हणणारे मुख्यमंत्री काही का करत नाहीत? असा सवाल सुद्धा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

सरकारला ओबीसींची स्वतंत्र जनगणना करायची नाही. त्यांचे कारण काय आहे माहिती नाही. कदाचित सरकारला भीती असेल की संख्या पुढे आली तर त्यानुसार सर्व गोष्टी द्याव्या लागतील. सरकारने देशाला कंगाल केले आहे. आम्हाला लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वच गोष्टीमध्ये आमचा वाटा मिळायला हवा. जितकी लोकसंख्या आहे त्या तुलनेत भागीदारी दिली पाहिजे. यासाठी जनगणना केली पाहिजे. आम्ही काय सरकारच्या बापाचे बांधलेले आहोत काय? आमचा ओबीसींचा ▶▶ पान २ वर

# मी नाराज नाही, योग्य वेळी संधी मिळेल –समीर भुजबळ

मुंबई । प्रतिनिधी



**मी नाराज नाही, मुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिपदाबाबत चर्चा झाली. मात्र, मंत्रिपदाच्या शपथेसाठी वेळ अतिशय कमी होता त्यामुळे शपथविधी पार पडला नाही. भाजपकडून शब्द देण्यात आला आहे, ज्यावेळी मंत्रिमंडळ विस्तार होईल किंवा मंत्रिमंडळ फेरबदल होईल त्यावेळी मला नक्की संधी मिळेल, असे म्हणत राज्यसभा निवडणुकीच्या घडामोडीतील इनसाईड स्टोरीच समीर भुजबळ यांनी सांगितली.**

राष्ट्रवादी काँग्रेसची जागा आपल्याला मिळावी आणि पुतण्या समीर भुजबळांना मंत्रिपदाची संधी देण्यात यावी, अशी मागणी ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केली होती. मात्र, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांचा हा प्रस्ताव मान्य न केल्याने अखेर राजेंद्र जैन यांना राष्ट्रवादीने राज्यसभा खासदारकीची संदी दिली. राजेंद्र जैन यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींना १५०० रुपयांचा बसणार फटका

● उज्वला योजनेमध्ये सरकारकडून मोठा बदल

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान उज्वला योजनेच्या देशभरातील १०.५८ कोटींहून अधिक लाभार्थ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि चिंताजनक बातमी आहे. सरकारने एलपीजी सबसिडीच्या नियमांमध्ये मोठा बदल केला असून, वार्षिक अनुदानित सिलिंडरच्या संख्येत मोठी कपात केली आहे.या नव्या निर्णयामुळे गरीब आणि गरजू कुटुंबांचे,



विशेषतः घरखर्च सांभाळणाऱ्या 'लाडक्या बहिणीं'चे बजेट कोलमडणार असून, लाभार्थ्यांना वार्षिक १५०० रुपयांचा थेट फटका बसणार आहे.

या नव्या निर्णयामुळे गरीब आणि गरजू कुटुंबांचे, विशेषतः घरखर्च सांभाळणाऱ्या 'लाडक्या बहिणीं'चे बजेट कोलमडणार ▶▶ पान २ वर

# नीट पुनर्परीक्षेसाठी जूनपर्यंत प्रवेशपत्र मिळणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

नीट–यूजी २०२६ परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या आरोपांनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था आणि केंद्र सरकारने २१ जून रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठी अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था उभारली आहे. सुमारे २२.७९ लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित असलेल्या या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका निर्मिती आणि वितरण प्रक्रियेत अतिरिक्त गोपनीयता, बहुस्तरीय देखरेख आणि सायबर मॉनिटरिंगचा अवलंब करण्यात आला असून, परीक्षा प्रक्रियेवरील विश्वास पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

मूळ परीक्षा ३ मे रोजी घेण्यात आली होती. मात्र पेपरफुटीच्या आरोपांनंतर परीक्षा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यानंतर पुनर्परीक्षेचा निर्णय घेण्यात आला असून, २१ जून रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत देशभरात परीक्षा होणार आहे. परीक्षा पूर्वीप्रमाणेच पेन–अँड–पेपर ▶▶ पान २ वर

# प्रत्येक दर्गा म्हणजेच 'वक्फ'ची मालमत्ता नव्हे : उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

चेन्नई । वृतसंस्था

**प्रत्येक दर्ग्याला वक्फ मालमत्ता म्हटले जाऊ शकत नाही. एखादी मालमत्ता मुस्लिम धार्मिक संस्था आहे केवळ याच कारणावरून वक्फ बोर्ड आपल्या अधिकार क्षेत्राचा दावा करू शकत नाही.वक्फ बोर्डाला आपला मालकी हक्क कायदेशीररित्या सिद्ध करावा लागेल," असे स्पष्ट करत मद्रास उच्च न्यायालयाने २४० वर्षांपूर्वीच्या जुन्या दर्ग्याला वक्फ मालमत्ता घोषित करण्याचा तामिळनाडू वक्फ बोर्डाचा आदेश रद्द केला.**





ट्रिप्लिकेन येथील कामराज रोडवर असलेल्या दर्ग्याच्या मुतवल्लीच्या (व्यवस्थापक) वतीने अपीलकर्त्याने दावा केला की, हा दर्गा २४० वर्षे जुना असून त्यांच्या कुटुंबाकडून याची देखरेख केली जात आहे. त्यांनी दर्ग्याचे मुतवल्ली म्हणून 'ए. शँशा' यांच्या नियुक्तीच्या वक्फ बोर्डाच्या निर्णयाला आव्हान दिले होते. अपीलकर्त्याने आपल्या युक्तिवादात म्हटले की, ही जमीन वक्फ बोर्डाची नसून सार्वजनिक बांधकाम विभागाची () होती. वक्फ कायद्यांतर्गत ठरवून दिलेल्या प्रक्रियेचे पालन न करता, बोर्डाला या मालमत्तेला वक्फ मालमत्ता घोषित करण्याचा किंवा इतर कोणत्याही मुतवल्लीची नियुक्ती करण्याचा कोणताही अधिकार नव्हता, असा युक्तीवाद अपीलकर्त्याने केला होता. तामिळनाडू वक्फ बोर्डाने या अपीलाला विरोध केला आणि असा युक्तिवाद केला की, ही जमीन आणि त्याभोवतालचा परिसर मूळचा दर्ग्याचाच होता. काही कालावधीनंतर तो नगरपालिका अधिकारी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात गेला. वक्फ कायद्याच्या कलम ३६(४) अंतर्गत दर्ग्याची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले की, ही जमीन सरकारी 'पोरंबोक' (पडीक/सरकारी जमीन) म्हणून चिन्हांकित होती. ती 'भारत स्काऊट्स अँड गाईड्स'ला विनाभाडे तत्त्वावर वाटप करण्यात आली होती. परंतु, कुटुंबाने वक्फ बोर्डाच्या संमतीशिवाय दर्ग्याची जमीन फसवणूक करून नोंदणीकृत करून घेतली ▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंडेंच्या एफडीए पथकावर हल्ला

## महिला अधिकाऱ्याला स्कॉर्पिओखाली चिरडण्याचा प्रयत्न

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

तुकाराम मुंडेंच्या ' एफडीए ' पथकावर हल्ला; महिला अधिकाऱ्याला स्कॉर्पिओखाली चिरडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार ९ जून रोजी पहाटे पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे रहीमपूर परिसरात एका आयशर ट्रकची तपासणी केली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये तब्बल २५ पोती प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला आढळून आला. यानंतर अधिकाऱ्यांनी ट्रक जप्त करून पुढील कारवाईसाठी पोलिस संरक्षणाची प्रतीक्षा सुरू केली होती. मात्र, त्याचवेळी विनाक्रमांक काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून ५ ते ६ जण घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अधिकाऱ्यांना शिवीगाळ करत धमकावण्यास सुरुवात केली. परिस्थिती अधिक गंभीर बनवत आरोपींनी महिला अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांना लक्ष्य केले आणि त्यांच्या अंगावर ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# व्याजदर, महागाई आणि बाजाराचा नवा गणिती खेळ !

६ जून २०२६ रोजी अमेरिकेच्या शेअर बाजारात झालेली मोठी घसरण जागतिक गुंतवणूकदारांसाठी धोक्याची घंटा ठरली. तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश असलेल्या नॅस्डॅक निर्देशांकात एका दिवसात ४ टक्क्यांहून अधिक घसरण झाली, तर एस अँड पी ५०० निर्देशांक २.६ टक्क्यांनी आणि डाऊ जोन्स इंडस्ट्रियल अ‍ॅव्हरेज १.३५ टक्क्यांनी खाली आला. विशेष म्हणजे ही घसरण कोणत्याही आर्थिक संकटामुळे किंवा युद्धजन्य परिस्थितीमुळे नव्हे, तर अमेरिकेतील अपेक्षेपेक्षा मजबूत रोजगार आकडेवारीमुळे झाली. ही घटना आधुनिक वित्तीय बाजारपेठेतील एक महत्त्वाचा विरोधाभास अधोरेखित करते. अर्थव्यवस्थेसाठी चांगली बातमी ही नेहमीच शेअर बाजारासाठी चांगली असेल असे नाही.

अमेरिकेच्या कामगार विभागाने जाहीर केलेल्या रोजगार अहवालानुसार एप्रिल महिन्यात रोजगार निर्मितीचा वेग अपेक्षेपेक्षा जास्त राहिला. बेरोजगारीचा दर तुलनेने कमी पातळीवर कायम राहिला आणि रोजगार बाजारातील मजबुतीचे संकेत मिळाले. सामान्यतः अशा प्रकारचे आकडे आर्थिक प्रगतीचे द्योतक मानले जातात. रोजगार वाढला की ग्राहकांची क्रयशक्ती वाढते, उद्योगधंद्यांना चालना मिळते आणि आर्थिक वाढीला आधार मिळतो. मात्र या वेळी गुंतवणूकदारांनी या आकडेवारीकडे वेगळ्या नजरेने पाहिले. यामागील प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेली गेल्या काही वर्षांपासून महागाई नियंत्रणात आणण्यासाठी फेडरल रिझर्व्हने व्याजदर उच्च पातळीवर ठेवले आहेत. बाजारातील अनेक गुंतवणूकदारांना २०२६ मध्ये व्याजदर कपातीची अपेक्षा होती. परंतु मजबूत रोजगार अहवालामुळे अर्थव्यवस्था अद्याप वेगाने वाढत असल्याचे संकेत मिळाले. त्यामुळे महागाईचा दबाव कायम राहू शकतो आणि फेडरल रिझर्व्हला व्याजदर कमी करण्याची घाई राहणार नाही, अशी भीती निर्माण झाली. व्याजदर वाढल्यास किंवा दीर्घकाळ उच्च राहिल्यास त्याचा सर्वाधिक परिणाम तंत्रज्ञान कंपन्यांवर होतो. कारण या कंपन्यांचे मूल्यांकन भविष्यातील अपेक्षित नफ्यावर आधारित असते. उच्च व्याजदरांमुळे भविष्यातील उत्पन्नाचे वर्तमान मूल्य कमी होते आणि गुंतवणूकदार अधिक सुरक्षित पर्यायांकडे वळतात. परिणामी कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमिकंडक्टर आणि उच्च-वाढीच्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली. याच काळात डिजिटल मालमत्तांनाही मोठा फटका बसला. च्या किमतीत लक्षणीय घसरण झाली. गुंतवणूकदारांनी जोखीम असलेल्या मालमत्तांमधून पैसे काढून तुलनेने सुरक्षित गुंतवणूक पर्यायांकडे मोर्चा वळवला. क्रिप्टोकरन्सी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील शेअर्स हे दोन्ही उच्च जोखमीचे मानले जात असल्याने त्यांच्यावर दबाव वाढला. अर्थतज्ज्ञांच्या मते, ही घसरण संपूर्ण आर्थिक संकटाचे लक्षण नाही. उलटपक्षी, बाजाराने अतिआशावादी अपेक्षांचे पुनर्मूल्यांकन करण्यास सुरुवात केल्याचे हे संकेत आहेत. गेल्या दोन वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये प्रचंड तेजी पाहायला मिळाली. अनेक कंपन्यांचे बाजारमूल्य त्यांच्या प्रत्यक्ष आर्थिक कामगिरीच्या तुलनेत झपाट्याने वाढले. त्यामुळे काही विश्लेषकांनी या परिस्थितीची तुलना २००० च्या दशकाच्या सुरुवातीच्या डॉट-कॉम बबलशी करण्यास सुरुवात केली आहे. तथापि, आजची परिस्थिती डॉट-कॉम युगापेक्षा वेगळी आहे. त्या काळातील अनेक इंटरनेट कंपन्या नफ्यात नव्हत्या, तर आजच्या आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्या अब्जावधी डॉलर्सचा नफा कमावत आहेत. त्यामुळे सध्याची घसरण ही संपूर्ण क्षेत्राच्या पतनाची सुरुवात नसून मूल्यांकनातील सुधारणा असू शकते. तरीही गुंतवणूकदारांनी केवळ उत्साहाच्या भरात गुंतवणूक करण्याऐवजी कंपन्यांच्या मूलभूत आर्थिक स्थितीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

या घडामोडींचा परिणाम केवळ अमेरिकेपुरता मर्यादित राहणार नाही. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि वित्तीय बाजारपेठ म्हणून अमेरिकेतील निर्णयांचा परिणाम भारतासह जगभरातील बाजारांवर होतो. अमेरिकन व्याजदर दीर्घकाळ उच्च राहिल्यास परदेशी गुंतवणूक प्रवाहावर परिणाम होऊ शकतो. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील गुंतवणूक कमी होण्याची शक्यता वाढते आणि चलनविषयक अस्थिरताही निर्माण होऊ शकते. भारतीय गुंतवणूकदारांसाठीही या घडामोडी महत्त्वाच्या आहेत. जागतिक बाजारपेठांमधील अस्थिरतेचा परिणाम भारतीय शेअर बाजारावर होऊ शकतो. त्यामुळे अल्पकालीन चढउतारांकडे भावनिक दृष्टिकोनातून न पाहता दीर्घकालीन गुंतवणूक धोरणावर भर देणे आवश्यक आहे. आर्थिक मूलभूत घटक मजबूत असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणे आणि जोखीम व्यवस्थापनाला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. ६ जून २०२६ च्या घसरणीने एक महत्त्वाचा धडा दिला आहे. मजबूत अर्थव्यवस्था आणि मजबूत शेअर बाजार हे नेहमीच एकाच दिशेने जातील असे नाही. आजच्या वित्तीय जगात व्याजदर, महागाई आणि गुंतवणूकदारांच्या अपेक्षा या घटकांचा बाजारावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे आर्थिक आकडेवारीकडे केवळ सकारात्मक किंवा नकारात्मक म्हणून पाहण्याऐवजी तिचे व्यापक परिणाम समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. आगामी काळात फेडरल रिझर्व्हची भूमिका, महागाईचे आकडे आणि रोजगार बाजारातील स्थिती यावर जागतिक वित्तीय बाजारांचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल.

# बीडच्या विकासासाठी आ.संदीप क्षीरसागर यांचा जोरदार पाठपुरावा

## मतदारसंघातील महत्वाच्या विकासकामांबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची घेतली भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड शहराच्या विकासाला गती देण्यासाठी आणि रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मुंबईत शासनाकडे जोरदार पाठपुरावा सुरू केला आहे. बीड शहरातील अंतर्गत महामार्गाचे रुंदीकरण करणे आणि नगर परिषदेच्या विकासकामांवरील स्थगिती उठवणे या दोन प्रमुख मागण्यांसाठी त्यांनी मंगळवारी (दि.९) रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. महामार्ग रुंदीकरणासाठी केंद्रीय निधी उपलब्ध करून देण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बीड शहरातील रस्ते विकासावर चर्चा केली.**





सोलापूरबीडधुळे हा राष्ट्रीय महामार्ग बीड शहरातून जातो. हा मार्ग बीडच्या व्यापाराचा आणि दळणवळणाचा प्रमुख दुवा आहे. या मार्गावर वाढती वाहतूक, नागरिकांची गैरसोय आणि सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता रस्त्याचे रुंदीकरण व आधुनिकीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्रीय मार्ग निधी कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, या प्रस्तावास विशेष बाब म्हणून तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. तसेच शहरातील भाजी मंडईच्या मंजूर कामांवरील स्थगिती उठवण्यासाठी आ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. बीड नगर परिषदेला वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विकासकामांच्या निधीवर सध्या स्थगिती आहे. ही स्थगिती तातडीने उठवण्याची मागणी त्यांनी केली. या निधीतून महात्मा फुले नवीन भाजी मंडई परिसराचे सुशोभीकरण व नूतनीकरण, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील भाजी मंडईचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. निधीअभावी ही कामे रखडली असून सर्वसामान्यांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे संबंधित विभागाला तात्काळ कामे सुरू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली. दरम्यान बीडकरांना चांगले रस्ते, सुरक्षित प्रवास आणि आधुनिक पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. बीडच्या विकासासाठी आवश्यक असलेला प्रत्येक निधी आणि प्रत्येक प्रकल्प मंजूर करून घेण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

# मॉन्सूनने आगेकूच सुरूच; पुढील दोन दिवस राज्यात वादळी पावसाचा इशारा

**पुणे। प्रतिनिधी**

**नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनने आज ईशान्य भारतातील उर्वरित सर्व राज्ये, संपूर्ण सिक्कीम आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालच्या काही भागांमध्ये प्रगती केली आहे. त्यामुळे देशातील मॉन्सूनचा व्याप आणखी वाढला असून पुढील वाटचालीसाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली आहे, असे हवामानशास्त्र विभागाने जाहीर केले आहे.**

मॉन्सूनने सोमवारी कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि सोलापूरपर्यंत मॉन्सूनने मजल मारली. त्यानंतर आज या भागातील मॉन्सूनची वाटचाल आज 'जैसे थे' असून पुढील दोन ते तीन दिवसांत राज्याच्या आणखी भागात मॉन्सूनची प्रगती होण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे.त्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे. पुढील चार ते पाच दिवसांत मॉन्सून महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांच्या आणखी काही भागात प्रगती करेल. तसेच तामिळनाडूचा उर्वरित भाग, पश्चिम बंगाल, ओडिशा, छत्तीसगड, झारखंड, बिहार आणि बंगालच्या उपसागरातील आणखी काही भाग मॉन्सूनच्या प्रभावाखाली येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. सध्या मॉन्सूनची उत्तरेकडील सीमा अरबी समुद्रातील १८ अंश उत्तर अक्षांशापासून महाराष्ट्रातील हर्णे आणि सोलापूर, कर्नाटकातील कलबुर्गी, आंध्र प्रदेशातील नांद्याल, तामिळनाडूतील चेन्नई मार्गे पश्चिम बंगालमधील सिलीगुडी आणि सिक्कीम सीमेपर्यंत आहे. कोकणातील पालघर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण व दमट हवामानासह हलक्या पावसाची शक्यता असून ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम, तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजा, मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यांसह हलका ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांतही हलका ते मध्यम पाऊस, तर काही ठिकाणी मेघगर्जनेसह वादळी पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. विदर्भात अकोला, बुलडाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांत विजांसह वादळी पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित राज्यात कोरड्या हवामानासह उन्हाचा चटका कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. बुधवारी कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस सुरू राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह हलका ते मध्यम सरी हजेरी लावण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मराठवाड्यात बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी पावसाच्या सरींचा अंदाज आहे. विदर्भात अकोला, अमरावती, भंडारा, बुलडाणा, नागपूर, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यांत विजा आणि वाऱ्यासह वादळी पावसाची शक्यता असून, काही भागांत मेघगर्जनाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे.

# मेंढपाळांचे स्थलांतर रोखण्यासाठी अर्धबंदिस्त मेंढीपालन योजनेचा प्रकल्प अहवाल सादर करा-पंकजा मुंडे

## मंत्रालयातील आढावा बैठकीत निर्देश; कृषी मंत्री दत्ता भरणे, आ. प्रताप अडसड यांची उपस्थिती

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर आणि भटकंती कमी करण्यासाठी अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन व्यवसाय राबविण्याच्या दृष्टीने सविस्तर अभ्यास करून प्रकल्प अहवाल सादर करावा, असे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.**

राज्यातील मेंढपाळांच्या स्थलांतराच्या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस कृषी मंत्री दत्ता भरणे, आमदार प्रताप अडसड, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन, पुण्यश्लोक अहिल्याबाई महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शीतलकुमार मुकणे तसेच अमरावती मेंढपाळ धनगर विकास मंचचे अध्यक्ष संतोष महात्मे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील बहुतांश मेंढपाळ मेंढीपालन व्यवसायासाठी वर्षभर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करतात. या सततच्या भटकंतीमुळे त्यांच्या कुटुंबांना शिक्षण, आरोग्य, निवास, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य यांसारख्या अनेक मूलभूत समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध न झाल्याने काही ठिकाणी गंभीर घटना आणि जीवितहानी झाल्याची नोंद आहे. या पार्श्वभूमीवर या समस्येवर दीर्घकालीन आणि प्रभावी उपाययोजना शोधण्याची आवश्यकता असल्याचे पंकजा मुंडे यांनी नमूद केले. बैठकीत एका ठिकाणी अर्धबंदिस्त पद्धतीने मेंढीपालन



करण्याच्या संकल्पनेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर ही योजना सुरू करण्यासाठी आवश्यक बाबींचा अभ्यास करून व्यवहार्य प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सूचना मंत्री मुंडे यांनी दिल्या. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अर्धबंदिस्त शेळी व मेंढीपालनासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय आणि पुढील उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी सांगितले की, सध्या राज्यात राबविण्यात येत असलेली राजे होळकर महामेष योजना वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी आहे. मात्र ही योजना मेंढपाळ बचत गट, उत्पादक संस्था किंवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून सामूहिक स्वरूपात राबविल्यास एका ठिकाणी पायाभूत सुविधा उभारणे शक्य होईल. त्यामुळे मेंढपाळांचे वारंवार होणारे स्थलांतर कमी होऊन त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला चालना मिळेल, तसेच सामाजिक आणि आर्थिक विकासालाही गती मिळू शकेल. कृषी मंत्री दत्ता भरणे यांनीही या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित विभागांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी आणि मेंढपाळांच्या प्रश्नांवर लवकरात लवकर ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश दिले. राज्यातील धनगर व मेंढपाळ समाजाच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अर्धबंदिस्त मेंढीपालनाचा पर्याय महत्त्वपूर्ण ठरू शकतो, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# पान १ वरून...

पान १ वरून...

## कर्जमाफीपासून वंचित ६ लाखांहून

या शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी सातत्याने केली जात होती. अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलने, निवेदने आणि पाठपुरावा करूनही निधीअभावी हा प्रश्न रखडला होता. अखेर राज्य सरकारने या प्रकरणाचा आढावा घेत १४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळणार असून नव्या हंगामासाठी कर्जपुरवठा आणि शेती गुंतवणुकीचा मार्गही मोकळा होणार आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक शेतकरी या निर्णयाची प्रतीक्षा करत होते. दरम्यान, मंत्रिमंडळ बैठकीत प्रशासन अधिक कार्यक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेलाही मंजुरी देण्यात आली. सध्या अस्तित्वात असलेल्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या वाढवून ४३ करण्यात येणार आहे. एकाच विभागाअंतर्गत कार्यरत असलेले काही उपविभाग स्वतंत्र विभाग म्हणून कामकाज पाहतील. त्यामुळे विविध विषयांवरील निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान होईल, फाइल निकाली काढण्याचा कालावधी कमी होईल आणि प्रशासनातील समन्वय वाढेल, असा सरकारचा दावा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या पुनर्रचनेसाठी कोणतीही नवीन पदनिर्मिती करण्यात येणार नाही. विद्यमान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातूनच कामकाजाचे पुनर्वाटप करण्यात येणार असून त्यामुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसल्याचे सांगण्यात आले. विभागनिहाय जबाबदाऱ्या स्पष्ट झाल्याने नागरिकांना सेवा अधिक जलद गतीने मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याशिवाय उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित काही महत्त्वाच्या प्रस्तावांनाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. राज्यातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, उद्योग क्षेत्राशी सुसंगत कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध करून देणे या उद्देशाने विविध उपाययोजनांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. यासंदर्भातील सविस्तर निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे. कर्जमाफी, प्रशासनिक पुनर्रचना आणि शिक्षण क्षेत्रातील निर्णयांमुळे राज्य सरकारने शेतकरी, नागरिक आणि विद्यार्थ्यांशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केल्याचे या मंत्रिमंडळ बैठकीतून स्पष्ट झाले आहे. विशेषतः कर्जमाफीच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

--------------

## दादांच्या राष्ट्रवादीत

पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पार्थ पवार आणि इद्रीस नाईक यांच्यात चर्चा झाली. या चर्चेत आपण आमदारकीचा राजीनामा देणार नाही, अशी भूमिका इद्रीस नाईकवाडी यांनी मांडल्याची सूत्रांची माहिती आहे.दरम्यान, इद्रीस नाईकवाडी हे विधान परिषदेचे आमदार आहेत, नाईकवाडी यांनी राजीनामा दिल्यास दुसऱ्या नवीन चेहऱ्याला संधी देण्यासाठी पार्थ पवार प्रयत्न करत असल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत राजकारण सध्या चर्चेचा विषय बनलं आहे. गेल्याच महिन्यात राष्ट्रवादीचे सरचिटणीस आनंद परांजपे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. इद्रीस नायकवडी हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून राज्यपाल नियुक्त कोट्यातून आमदार आहेत. दिवंगत नेते अजित पवार यांनी अल्पसंख्यांक चेहरा म्हणून इद्रीस नायकवाडी यांना विधानपरिषद आमदारकीची संधी दिली होती. मात्र, अजित पवारांच्या निधनानंतर आता पक्षातील नेतृत्वाकडून त्यांना राजीनामा मागितला जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे स्वीय सहायक इद्रीस नायकवाडी यांना भेटल्याचे समजते.

-------------

## मोदी मंत्रिमंडळात

माहितीनुसार रेल्वे, अर्थ (वित्त), कॉर्पोरेट व्यवहार, कोळसा, वस्त्रोद्योग, माहिती व प्रसारण, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान, ग्रामीण विकास, रसायने व खते, सहकार, मत्स्यव्यवसाय, जलशक्ती, कृषी, पर्यावरण, कायदा व न्याय मात्र, याबाबत सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

-------------

## मी नाराज नाही, योग्य वेळी

असून त्यांची बिनविरोध निवड झाल्याचं पाहायला मिळालं. मात्र, आपल्याला संधी न मिळाल्याने छगन भुजबळांची नाराजी उघड झाली. जो न्याय इतर नेत्यांच्या मुला-बाळांना लागू तोच मलाही मिळायला हवा, असे छगन भुजबळ यांनी म्हटले होते. आता, समीर भुजबळ यांनी देखील राज्यसभा आणि मंत्रिपदासंदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे.मी नाराज नाही, मुख्यमंत्र्यांसोबत मंत्रिपदाबाबत चर्चा झाली. मात्र, मंत्रिपदाच्या शपथेसाठी वेळ अतिशय कमी होता त्यामुळे शपथविधी पार पडला नाही. भाजपकडून शब्द देण्यात आला आहे, ज्यावेळी मंत्रिमंडळ विस्तार होईल किंवा मंत्रिमंडळ फेरबदल होईल त्यावेळी मला नक्की संधी मिळेल, असे म्हणत राज्यसभा निवडणुकीच्या घडामोडीतील इनसाईड स्टोरीच समीर भुजबळ यांनी सांगितली. दरम्यान, राज्यसभा निवडणुकीत राष्ट्रवादीने प्रफुल पटेल यांचे निकटवर्ती असलेल्या राजेंद्र जैन यांना संधी दिली असून विधानपरिषद निवडणुकीत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे यांना बिनविरोध निवडून आणले आहे. त्यामुळे, समीर भुजबळ यांच्या मंत्रिपदासाठी छगन भुजबळ आग्रही होते. मात्र, त्यांची मागणी सध्यातरी वेटींगवर असल्याचं दिसून येतं. आज २५ वर्षापेक्षा जास्त काळ राष्ट्रवादी सोबत काम करत आहे. त्यामुळे मला संधी मिळायला काहीच अडचण नाही, अशी भूमिका समीर भुजबळ यांनी मांडली. तसेच, भविष्यात मंत्रिपदाचा शब्द देण्यात आल्याचंही त्यांनी स्पष्टपणे सांगितलं.

----------

## मोदींनी १२ वर्षात देशाचे

कॉलम ठेवला तरच आम्ही सहकार्य करू. सरकारला जर गुन्हे दाखल करायचे असतील तर त्यांनी गुन्हे दाखल करावे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने जर आमचा कॉलम दिला नाही आणि माहिती न दिल्यावर गुन्हे दाखल करायचे ठरवले तर आम्ही सर्व ओबीसी मिळून जेल भरो आंदोलन करू. आमच्या हक्काचे तुम्ही देणार नसताल तर आम्ही जेलमध्ये जाण्यासाठी तयार आहोत.जनगणनेमध्ये ओबीसीचा कॉलम नाही. जनगणनेची पहिली फेरी ही संपत आली आहे. दुस-या फेरीमध्ये आम्ही ओबीसींचा कॉलम ॲड करणार असे सरकारतर्फे सांगितले जात आहे. मात्र मोदी सरकार हे काही करणार नाही. ओबीसींची संख्या किती आहे हे सरकार पुढे येऊ देणार नाही. यामुळे ओबीसींच्या हक्काचे जे काही आहे ते मिळणार नाही. सरकार ओबीसींची मते घेते पण त्यांच्यासाठी काहीच काम करत नाही. ओबीसी डीएनए आहे म्हणणारे मुख्यमंत्री काही का करत नाहीत? असा सवाल सुद्धा वडेट्टीवार यांनी केला आहे.

-----------

## केवळ मतांसाठी योजना; नंतर

त्यांनी लगावला. तसेच राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित करत, निवडणुकीत सरसकट लाभ दिल्यानंतर आता विविध निकष लावून लाखो महिलांना योजनेबाहेर काढले जात असल्याचा आरोप केला.पुढील काळात आणखी निकष लावून लाभार्थ्यांची संख्या कमी केली जाऊ शकते, असा दावा करत रोहित पवार यांनी सरकारवर 'मतांसाठी योजना आणि नंतर लाभांवर कात्री' अशी टीका केली. निवडणुकांपूर्वी आकर्षक घोषणा करून मतदारांना आश्वासने दिली जातात, मात्र निवडणुका संपल्यानंतर त्या योजनांचे स्वरूप बदलले जाते, असा आरोपही त्यांनी केला.

------------

## लाडक्या बहिणींना १५०० रुपयांचा

असून, लाभार्थ्यांना वार्षिक १५०० रुपयांचा थेट फटका बसणार आहे. नव्या नियमांनुसार, सरकारने आता उज्ज्वला योजनेअंतर्गत मिळणाऱ्या वार्षिक अनुदानित सिलिंडरची संख्या ९ वरून थेट ४ केली आहे.यापूर्वी लाभार्थ्यांना वर्षाला ९ रिफिलवर प्रति सिलिंडर ३०० रुपये अनुदान (सबसिडी) मिळत होते. म्हणजेच वर्षाला एकूण २,७०० रुपयांचा आर्थिक लाभ मिळत होता. आता नव्या नियमांनुसार लाभार्थ्यांना केवळ पहिल्या ४ रिफिल्ससाठीच प्रति सिलिंडर ३०० रुपये अनुदान दिले जाईल. यामुळे आता वार्षिक एकूण अनुदान फक्त १,२०० रुपये मिळेल. परिणामी, लाभार्थ्यांचे वार्षिक १५०० रुपयांचे नुकसान होणार आहे. काही दिवसांपूर्वीच दिल्लीत घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीनंतर दिल्लीत १४.२ किलोच्या सिलिंडरची किंमत ९४२ रुपये झाली आहे. नव्या नियमांनुसार पहिले ४ सिलिंडर ३०० रुपये सबसिडी वजा जाता लाभार्थ्यांना प्रति सिलिंडर ६४२ रुपये पडेल.वर्षातील पहिले ४ सिलिंडर संपल्यानंतर, पुढील सर्व सिलिंडर लाभार्थ्यांना बाजाराभावाप्रमाणे (सध्याच्या दरानुसार ९४२ रुपये) पूर्ण किंमत देऊन खरेदी करावे लागतील. २०१६ मध्ये जेव्हा पंतप्रधान उज्ज्वला योजना सुरू झाली, तेव्हा लाभार्थ्यांना वर्षाला तब्बल १२ सिलिंडरवर अनुदान दिले जात होते. मात्र, गेल्या काही वर्षांत सरकारने या संख्येत टप्प्याटप्प्याने कपात केली. आधी ही संख्या १२ वरून ९ करण्यात आली आणि आता थेट ४ वर आणली गेल्याने सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरावरील आर्थिक बोजा कमालीचा वाढणार आहे.

----------

## तुकाराम मुंडेंच्या

भरधाव स्कॉर्पिओ घालण्याचा प्रयत्न केला.प्रसंगावधान राखत त्यांनी बाजूला उडी मारल्याने मोठी दुर्घटना टळली. या गोंधळाचा फायदा घेत आरोपींनी जप्त केलेला गुटख्याने भरलेला ट्रक घटनास्थळावरून पळवून नेला. या घटनेमुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. प्रकरणाची माहिती मिळताच वाळूज पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला. आरोपींविरोधात जीवे मारण्याचा प्रयत्न, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे आणि धमकावणे यांसह विविध गंभीर कलमांखाली कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, फरार आरोपी आणि पळवून नेलेल्या ट्रकचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

-----------------

## प्रत्येक दर्गा म्हणजेच 'वक्फ'ची मालमत्ता नव्हे :

होती. मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के. गोविंदराजन थिलाकवथी यांनी स्पष्ट केले की, ही मालमत्ता वक्फच्या यादीत समाविष्ट केली जावी, हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता. या जमिनीचे सर्वेक्षणही करण्यात आले नव्हते. सरकारी राजपत्रात ही जमीन वक्फ मालमत्ता म्हणून अधिसूचित करण्यात आली नाही. प्रत्येक कब्र किंवा दर्गा स्वतःहून वक्फ मालमत्ता बनत नाही. न्यायालय अनेकदा खासगी कौटुंबिक मकबरा आणि सार्वजनिक धार्मिक व्यवस्थेचा भाग म्हणून राखलेला मजार यामध्ये फरक करते. त्यामुळे एखाद्या दर्ग्याचे कधीही वक्फ म्हणून सर्वेक्षण, नोंदणी किंवा अधिसूचना झाली नसेल, तर वक्फ बोर्ड केवळ ती एक मुस्लिम धार्मिक संस्था आहे या कारणास्तव त्यावर आपला ताबा सांगू शकत नाही. अधिकार क्षेत्र हे ती मालमत्ता कायदेशीररित्या वक्फ असल्याच्या पुराव्यावर अवलंबून असते,'' असे न्यायमूर्ती के. गोविंदराजन यांनी स्पष्ट केले.

-------------

## नीट पुनर्परीक्षेसाठी जूनपर्यंत

पद्धतीने घेतली जाणार आहे. शिक्षण मंत्रालय आणि संबंधित यंत्रणांनी परीक्षा प्रक्रियेतील संभाव्य त्रुटी रोखण्यासाठी विशेष उपाययोजना केल्याची माहिती उच्च शिक्षण विभागाने दिली आहे.यामध्ये प्रश्नपत्रिका निर्मिती प्रक्रियेवर अधिक कडक नियंत्रण, डिजिटल प्लॅटफॉर्मवरील देखरेख, सोशल मीडिया मॉनिटरिंग आणि परीक्षा केंद्रांवरील निरीक्षण यांचा समावेश आहे. प्रश्नपत्रिका तयार करणा-या तज्ज्ञांना सुरक्षित ठिकाणी विलगीकरणात ठेवण्यात आले असून, परीक्षा पूर्ण होईपर्यंत त्यांच्यावर देखरेख ठेवली जाणार आहे. तसेच प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीसाठी अतिरिक्त सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च शिक्षण विभागाने दिली.भारतातील ५५१ शहरांमध्ये तसेच परदेशातील १४ शहरांमध्ये आयोजित केली जाणार आहे. वैद्यकीय शिक्षणासाठीची ही देशातील सर्वांत मोठ्या प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाते.एनटीएकडून पुनर्परीक्षेसाठी नवीन प्रवेशपत्र जारी करण्यात येणार असून, ते १४ जूनपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांनी जुन्या प्रवेशपत्राऐवजी नव्याने जारी करण्यात येणारे प्रवेशपत्र डाऊनलोड करणे आवश्यक राहणार आहे.

cmyk



## थोडक्यात

### माजी आमदार राजेंद्र जगताप यांचा अभिष्टचिंतन सोहळा रद्द

बीड । प्रतिनिधी

आपल्या अनोख्या जनकल्याणक कार्यशैलीने आमदारकीचा कार्यकाळ गाजवणारे आणि सर्वधर्मीय व विविध जाती बांधवांना आपलेसे करत सर्वधर्मसमभाव या तत्त्वांने अनोखी कार्यशैली जपणारे, जनसामान्यात अत्यंत उज्वल आणि उत्तम प्रतिमा असणारे माजी आमदार राजेंद्रजी जगताप साहेब यांचा वाढदिवस १०.जुन रोजी दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होत असतो.



बीड जिल्हाच नव्हे तर जिल्हाबाहेरील राजकीय, शैक्षणिक,सामाजिक उद्योग क्षेत्रात हिरीरीने योगदान देणारे असंख्य लोक साहेबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी प्रतिवर्षी साहेबांच्या निवासस्थानी येत असतात. एकूणच १० जून ही तारीख साहेबांवर प्रेम करणाऱ्या असंख्य लोकांसाठी एक आनंदाची पर्वणी असते मात्र अवघ्या चार महिन्यापूर्वी राज्याचे कर्तव्यदक्ष आणि लोकाभिमुख उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अपघाती निधन व त्या पाठोपाठच मागील पंधरवड्यात राजेंद्रजी जगताप यांचे कनिष्ठ बंधू किशोरराव जगताप यांचे निधन झाल्याने यावर्षी जगताप साहेबांचा अभिष्टचिंतन सोहळा रद्द करण्यात आल्याची नोंद साहेबांवर प्रेम असणाऱ्या लोकांनी घ्यावी असे आवाहन साहेबांचे विशेष स्नेही अशोकराव हिंगे व साहेबांचे चिरंजीव युवराज जगताप यांनी केले आहे.

### टोकियोत बीडच्या जाधव दाम्पत्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव

बीड । प्रतिनिधी

भारतीय आयुर्विमा महामंडळाच्यावतीने टोकियो (जपान) येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित कॉर्पोरेट क्लब कन्व्हेन्शन २०२६ मध्ये बीडचे सुप्रसिद्ध विमा सल्लागार राजेश जाधव आणि त्यांच्या पत्नी आशा जाधव यांचा विशेष गौरव करण्यात आला. या आंतरराष्ट्रीय अधिवेशनात सहभागी होणारे ते बीड जिल्ह्यातील एकमेव दाम्पत्य ठरले आहे.

गेल्या १५ वर्षांपासून एलआयसी क्षेत्रात कार्यरत असलेल्या राजेश जाधव यांनी आपल्या उत्कृष्ट सेवेच्या जोरावर हे घवघवीत यश संपादन केले आहे. सध्या ते ३,००० हून अधिक पॉलिसीधारकांना विमा सेवा देत असून, सुमारे ५,००० कोटी रुपयांच्या भव्य जोखीम संरक्षण पोर्टफोलिओचे यशस्वी व्यवस्थापन पाहत आहेत. या सुविधेसाठी त्यांचे बीड येथे शाखा कार्यालय आणि छत्रपती संभाजीनगर येथे कॉर्पोरेट कार्यालय कार्यरत आहे. सन २०२१-२२ मध्ये त्यांची एलआयसीच्या सर्वोच्च कॉर्पोरेट क्लबमध्ये पदोन्नती झाली. बीड एलआयसी शाखेच्या ७० वर्षांच्या प्रदीर्घ इतिहासात हा बहुमान मिळवणारे ते पहिलेच दाम्पत्य ठरले आहे. विमा क्षेत्रातील जागतिक स्तरावरील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या कोर्ट ऑफ द टेबल बहुमानासाठी त्यांची तब्बल पाच वेळा निवड झाली असून, त्यांनी अनेक एमडीआरटी पुरस्कारही पटकावले आहेत.

राजेश जाधव यांच्या या उल्लेखनीय यशामुळे केवळ बीड जिल्ह्याचाच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्याचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला आहे. जाधव दाम्पत्याच्या या जागतिक यशाबद्दल बीडसह संपूर्ण महाराष्ट्रातील सामाजिक, व्यावसायिक आणि विमा क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बीडच्या विकास प्रश्नी डॉ.योगेश क्षीरसागरांनी घेतली पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांची भेट

## अग्निशामक दलासाठी २ वाहने मिळणार, रस्ते, शेतीसह प्रलंबित कामांवरही चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे मंगळवारी (दि.९) भेट घेतली. त्यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे, नागरी सुविधा, शेतकरी प्रश्नांसंदर्भात चर्चा केली. यावेळी पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी विविध मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

बीड शहरात मागील काही महिन्यांत आगीच्या दुर्घटनांमध्ये वाढ झाली असून त्यामध्ये नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर बीड नगरपालिकेच्या अग्निशामक दलाकडे अत्याधुनिक वाहने व आवश्यक यंत्रसामग्रीची कमतरता असल्याचे निदर्शनास आणून देत डॉ.क्षीरसागर यांनी या समस्येच्या निराकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. यावर पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून जिल्हा वार्षिक योजनेतून एक सुसज्ज अग्निशामक वाहन मंजूर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शासनाच्या योजनेतून यापूर्वीच मंजूर झालेले, मात्र अद्याप वितरण न झालेल्या दुसऱ्या वाहनाबाबतही संबंधित विभागाशी चर्चा करून ते लवकर



उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश दिले. त्यामुळे लवकरच २ नवीन अग्निशामक वाहने बीडच्या अग्निशामक दलाच्या ताफ्यात दाखल होणार असल्याचे निश्चित झाले आहे. यावेळी बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील विविध कामे संथगतीने सुरू असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा मुद्दाही डॉ.क्षीरसागर यांनी उपस्थित केला. या कामांमुळे वाहतूक कोंडी, अपघात आणि जीवितहानीच्या घटनाही घडत असल्याने संबंधित यंत्रणेला निर्देश देऊन कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, बीड विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील विविध विकासकामे प्रलंबित असून त्यासाठी शासनस्तरावरून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. बीड शहरातील रस्ते व इतर नागरी विकासकामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून भरीव निधीची तरतूद करण्याची मागणीही त्यांनी केली. बीड विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांची जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, खासगी बँका, कृषी विभाग आणि महावितरणकडे विविध प्रकरणे प्रलंबित आहेत, त्याकडे लक्ष वेधत त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित यंत्रणांना निर्देश देण्याची विनंतीही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. याशिवाय मतदारसंघातील विविध विकासकामे, नागरी सुविधा आणि जनहिताच्या प्रश्नांवर दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली. पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

**मंत्री ना.पंकजाताई मुंडेंसोबत डॉ.योगेश क्षीरसागरांची निवडणुकीसंदर्भात चर्चा**

बीड-लातूर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणूक व अन्य विकासकामासंदर्भात राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचीही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेतली. बीड मतदारसंघातील विकासकामे आणि मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली.

# आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा

## पत्रकार परिषद: बीड ते मुंबई पायी लाँग मार्चमध्ये सामिल व्हावे

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यातील आंबेडकरी पक्ष व संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली असून, आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा या घोषणेसह १० जूनपासून बीड ते मुंबई पायी लाँग मार्च काढण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

बीड शहरातील एका नामांकित हॉटेलमध्ये सोमवारी (दि.८) जून रोजी आयोजित पत्रकार परिषदेत आंबेडकरी समाजाच्या प्रतिनिधींनी ही घोषणा केली. या मार्चमध्ये राज्यभरातील विविध आंबेडकरी पक्ष, संघटना, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी बोलताना पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा पायी लाँग मार्च कोणत्याही जातीविरोधात नसून राज्य सरकारच्या धोरणांविरोधातील आंदोलन आहे. उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. अहवाल गुप्त ठेवून सरकार जनतेवर निर्णय लादण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रम सुरू असल्याने नागरिकांना अभ्यासपूर्ण मते मांडण्यासाठी अधिक वेळ मिळावा, यासाठी सूचना व हरकती सादर करण्याची मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढविण्याची मागणीही करण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला उपवर्गीकरण करणे बंधनकारक केलेले नसतानाही सरकार समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ जातींची भूमिका जाणून घेण्यासाठी लेखक, साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनेते यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. दरम्यान, या पायी लाँग मार्चमध्ये केवळ उपवर्गीकरणाचाच मुद्दा नसून कंत्राटी नोकरभरती, शिक्षणाचे खासगीकरण, जातनिहाय जनगणना तसेच अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष भरणे या प्रश्नांवरही सरकारला जाब विचारला जाणार असल्याचे सांगण्यात आले. सरकारी नोकरभरतीतील कंत्राटी पद्धत बंद करून समान व मोफत शिक्षणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणीही आंबेडकरी संघटनांनी केली. यावेळी सिद्धार्थ शिनगारे, अजय सरवदे, प्रेम कांबळे, ड.राजेश शिंदे, संदिप जाधव, धम्मानंद वाघमारे, मिलिंद सरपते, धम्मपाल विद्यागर, ज्ञानेश्वर कवठेकर आदींची पत्रकार परिषदेत उपस्थिती होती.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### आ. सुरेश धस यांच्या

वीजभार स्वतंत्र झाला असून पूर्वीच्या ट्रान्सफॉर्मरवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. परिणामी वाळुंज, टाकळशिंग, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी, तवलवाडी तसेच इतर गावांनाही अधिक स्थिर व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

वीजभाराचे योग्य विभाजन झाल्यामुळे वारंवार होणारे फॉल्ट, कमी दाबाची समस्या आणि लाईन ट्रिपिंगचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः कृषी पंपधारक शेतकऱ्यांना दिवसा अधिक सुरळीत वीज उपलब्ध होणार असल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होणार आहे. या महत्त्वपूर्ण कामाबद्दल वाळुंज, टाकळशिंग, सांगवी आष्टी, खडकत, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी व तवलवाडी परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आमदार सुरेश धस यांचे आभार मानले असून, त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक वर्षांपासूनची वीज समस्या मार्गी लागल्याची भावना व्यक्त केली आहे.

### राज्यस्तरीय महाराष्ट्र

परंपरा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने जपली आहे. सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, कृषी, उद्योग, आरोग्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि जनसेवा अशा विविध क्षेत्रांत उत्कृष्ट योगदान देणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराद्वारे सन्मानित करण्यात येते.

या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक अविनाश कदम (अध्यक्ष, आष्टी तालुका युवा पत्रकार संघ तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद) असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण आयोजन समिती कार्यक्रमाच्या तयारीत कार्यरत आहे. संयोजन समितीत उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, संतोष नागरगोजे, समीर शेख, अतुल जवणे, प्रेम पवळ,निसार शेख, राजेंद्र लाड, अक्षय विधाते, सोपान पगारे, अ‍ॅड. किशोर निकाळजे, सिताराम पोकळे (जेष्ठ पत्रकार), सय्यद बबलू, मनोज सातपुते, विठ्ठल राख, दादा पवळ, अमोल जगताप, अशोक कुताळ, आदिनाथ ठोंबरे, संतोष तांगडे, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, संस्कार लाड, सचिन पवार आदींचा समावेश आहे.राज्यभरातील पत्रकार, समाजसेवक, उद्योजक, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा हा पुरस्कार सोहळा कर्तृत्ववान व्यक्तींना प्रेरणा देणारा आणि समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन देणारा ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्याचे आवाहन आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

### कागदावरच विकास

पाहणी केलेली नसताना, संबंधितांनी संगनमत करून मस्टर दाखल केले आणि बोगस कामांचे बिल चक्क ऑनलाइन पद्धतीने मंजूर करून घेतले. यातून पंचायत समिती कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे भ्रष्ट प्रवृत्तींशी असलेले 'साटेलोटे' स्पष्टपणे उघड होत असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.केवळ विकासकामांतच नव्हे,तर ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजातही मोठा गैरव्यवहार सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. बाळेवाडी ग्रामपंचायतीच्या जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये काही व्यक्तींकडून सर्रास खाडाखोड केली जात आहे.पैशांची देवाणघेवाण करून हवे तसे बोगस जन्म आणि मृत्यूचे दाखले वाटले जात आहेत.ही अत्यंत गंभीर व फौजदारी कारवाईस पात्र असलेली बाब निदर्शनास आणून दिल्यानंतरही प्रशासनाने त्याकडे सोयीस्कर डोळेझाक केली आहे.शासनाचा निधी हा गावाच्या विकासासाठी असतो,तो अशा प्रकारे कागदावरच लुटण्यासाठी नाही. या सर्व गैरप्रकारांना कंटाळून आणि या धनदांडग्यांना व भ्रष्ट अधिकाऱ्यांना आवर घालण्यासाठी आम्ही आमच्या जिवाची पर्वा न करता आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे. जोपर्यंत या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही असा इशारा बाळेवाडीचे माजी सरपंच भीमराव पठारे,हनुमान गव्हाणे, संतोष बोंद्रे, अमोल आल्हाडे,योगेश आल्हाडे,आकाश सांगळे,परसराम लगड आदी ग्रामस्थांनी दिला आहे.

### वडवणीत शेतकऱ्यांना मोफत

कृषी सेवा केंद्रावर बियाणे येण्यासाठी रांगेमध्ये उभा रहावे लागले यामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होती. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे शेतकऱ्यांना एकदा नव्हे दोनदा रांगेमध्ये उभा राहून मोठा त्रास सहन करावा लागला आहे. सदरील वडवणी तालुक्यातील मोफत बियाण्यासाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांच्या संख्येनुसार बियाणे उपलब्ध न झाल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना बियाणे मिळालेले नाहीत त्यामुळे मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याचे दिसून आले. तरी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने बियाणेच उपलब्ध नाही तर मग शेतकऱ्यांना टोकन द्यायचे कशाला असा संतप्त सवाल शेतकऱ्याकडून विचारला जात आहे.

# उद्योजकांचे व्यासपीठ बी सी एन सर्कलच्या संचालकपदी अ‍ॅड.रवींद्र कानडे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

विश्वास, पारदर्शकता आणि व्यावसायिक प्रगती या मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या बी.सी.एन.सर्कल (बिझनेस काटलयस्ट नेटवर्क ) या उद्योजकांच्या प्रतिष्ठित नेटवर्क संस्थेच्या संचालकपदी शहरातील प्रसिद्ध उद्योजक ड. रवींद्र कानडे यांची निवड करण्यात आली आहे.

लाइफ कॅटलिस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांचे मार्फत बी.सी.एन सर्कल ही संस्था विविध क्षेत्रातील उद्योजक, व्यावसायिक आणि तज्ज्ञ व्यक्तींना एकत्र आणून परस्पर सहकार्य, व्यावसायिक संधींची देवाणघेवाण, विश्वासार्ह नेटवर्किंग आणि दीर्घकालीन व्यावसायिक संबंध निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या वाढत्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर ड. रवींद्र कानडे यांच्या अनुभवाचा लाभ संस्थेला मिळणार असल्याचा विश्वास सदस्यांनी



व्यक्त केला आहे.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक ड. रवींद्र कानडे हे कायदा,वित्तीय व्यवस्थापन आणि संघटनात्मक नेतृत्व या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवासाठी ओळखले जातात. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून उद्योजकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.संचालकपदी निवड झाल्यानंतर बोलताना ड. कानडे यांनी सांगितले की, बी सी एन हे केवळ नेटवर्किंगचे व्यासपीठ नसून उद्योजकांच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रभावी माध्यम आहे.विश्वास, सहकार्य आणि सकारात्मक व्यावसायिक संस्कृतीच्या माध्यमातून अधिकाधिक उद्योजकांना जोडून त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. संस्थेचे संस्थापक अतुल ठाकूर, सहसंस्थापक अमरीश देशपांडे तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी ड.कानडे यांच्या निवडीचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वामुळे बी सी एन सर्कल च्या कार्याला नवी दिशा मिळेल आणि मराठवाड्यातील उद्योजकांसाठी अधिक संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.बी.सी.एन सर्कलच्या माध्यमातून आगामी काळात उद्योजकांना व्यवसाय संदर्भ नवीन व्यावसायिक संधी, तज्ज्ञ मार्गदर्शन, प्रशिक्षण कार्यक्रम आणि उद्योगवृद्धीसाठी आवश्यक नेटवर्क उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.विश्वास, सहकार्य आणि व्यवसाय वृद्धीच्या ध्येयाने कार्य करणाऱ्या बी सी एन सर्कल चा शुभारंभ ज्येष्ठ उद्योजक, विविध राष्ट्रीय पुरस्कार विजेते डॉक्टर भावेश भाटिया यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी छत्रपती संभाजी नगर व मराठवाड्यामधील विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# सत्र न्यायालयाने दोन संशयित आरोपींची जामिनावर सुटका

बीड । प्रतिनिधी

गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २४७/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११५(२), ११८(१), ११८(२), १२६(२), ३२४(४), ३(५) व ३५२ अन्वये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील दोन संशयित आरोपींना आज सत्र न्यायालय, बीड यांनी जामीनअर्ज क्र ५१७/२०२५ मंजूर केला.

सदर प्रकरणात आरोपींच्या वतीने ड. किशोर खेडकर व ड.अनिल बारगजे यांनी न्यायालयासमोर सविस्तर युक्तिवाद केला. गुन्ह्याच्या स्वरूपासह तपासाची सद्यस्थिती, आरोपींचे न्यायालयीन सहकार्य तसेच जामीन मंजूर करण्यास अनुकूल असलेल्या विविध कायदेशीर बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात



**अ‍ॅड. किशोर खेडकर व ड.अनिल बारगजे यांचा युक्तिवाद यशस्वी**

आल्या. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांचा विचार करून मा. सत्र न्यायालय, २ रे बीड यांनी दोनही संशयित आरोपींना आवश्यक अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला. अ‍ॅड. किशोर खेडकर व ड.अनिल बारगजे यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# पाटोद्यात महाडीबीटी बियाण्यांसाठी शेतकऱ्यांच्या रांगा; रात्रीपर्यंत गर्दी

पाटोदा । प्रतिनिधी

महाडीबीटी पोर्टलमार्फत बियाणे निवडीचे संदेश प्राप्त झाल्यानंतर पाटोदा तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर बियाणे घेण्यासाठी केंद्रांवर दाखल होत आहेत. मात्र तालुक्यात बियाणे पुरवठ्यासाठी केवळ चारच दुकानदारांची निवड करण्यात आल्याने शेतकऱ्यांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

पाटोदा येथील बियाणे विक्री केंद्रांवर सकाळपासूनच शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसून आल्या. विशेष म्हणजे सायंकाळी आठ वाजल्यानंतरही अनेक शेतकरी दुकानाबाहेर बियाण्यांच्या प्रतीक्षेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले. आगामी पेरणी हंगाम डोळ्यासमोर ठेवून शेतकरी बियाणे मिळविण्यासाठी धावपळ




## केवळ चार विक्रेत्यांमुळे गैरसोय; कृषी विभागाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी

करत आहेत.काही शेतकऱ्यांनी दुकानदारांकडून मर्यादित प्रमाणात बियाणे वाटप होत असल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांना वेळेत बियाणे मिळणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी अतिरिक्त विक्री केंद्रे सुरू करण्याची मागणी केली आहे. शेतकरी वर्गातून कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन बियाणे वितरणासाठी अधिक दुकानदारांची नियुक्ती करावी, केंद्रांची संख्या वाढवावी तसेच शेतकऱ्यांची होणारी गैरसोय व संभाव्य पिळवणूक थांबवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे. रांग वाढतेय, पण केंद्रे नाहीत; कृषी विभागाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

# नालंदा फाउंडेशनतर्फे पाटोदा येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार

बीड । प्रतिनिधी

एमपीएससी किंवा यूपीएससी मध्ये यशाचे प्रमाण खूप कमी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ स्पर्धा परीक्षांना सर्वस्व मानून त्यात आयुष्य पणाला लावण्यापेक्षा, नेहमी आपल्याकडे 'ऑप्शन बी' तयार असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पाटोदा तालुका पुरवठा अधिकारी सैफ अय्युब मुल्ला यांनी व्यक्त केले.

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम रविवार, दि.७ रोजी तुलसी फॅशन डिझाईन कॉलेज, पाटोदा येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदिप रोडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी मा.हनुमंत गव्हाणे, पाटोदा नगर नगरपंचायतीचे नगरसेवक मा.शेख इम्रान शेख नूर, महसूल अधिकारी मा.शेख रशीद, मा.गणेश कवडे, प्रा.राम गायकवाड, मा.प्रा.डी.डी. राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना सैफ अय्युब मुल्ला म्हणाले की, स्पर्धा परीक्षा हा एक प्रकारे 'अनिश्चिततेचा खेळ' आहे, जिथे मेहनत करूनही यश मिळेलच याची खात्री नसते. त्यामुळे तरुण वयातील ही महत्त्वाची आणि कुशल वर्षे फक्त एकाच गोष्टीच्या मागे लागून वाया घालवू नका. अभ्यास नक्की करा, कष्ट करा, पण त्याला सुरक्षित पर्यायाची जोड देण्यासाठी



शिक्षणही सुरू ठेवा, असेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना महामानवांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे ज्ञानाचे प्रतीक बनण्यासाठी वाचन आणि ग्रंथ हेच प्रमुख साधन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वेळेचे महत्त्व ओळखून विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना करिअर निवड, स्पर्धा परीक्षा व विविध रोजगार संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.किशोर वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. डी.डी.राऊत यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

# नाफेडकडून कांदा खरेदीची घोषणा पहिल्याच दिवशी ठरली फोल

नाशिक : नाफेड आणि 'एनसीसीएफ'कडून आज सोमवारी नाशिक जिल्ह्यातील १५ बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी प्रत्यक्षात सुरु होणार होती. पण पहिल्याच दिवशी निफाड वगळता इतर ठिकाणी कांदा खरेदी सुरु होऊ शकलेली नाही. यामुळे पहिल्याच दिवशी कांदा खरेदीची घोषणा फोल ठरली.

नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदीसाठी ज्या संस्थांना नियुक्त केले आहे; त्या संस्थांचे प्रतिनिधी आज चांदवडमध्ये फिरकलेच नाहीत. आज त्यांची व्यापारासोबत बैठक होणार होती. पण एकाही संस्थेचा प्रतिनिधी तिथे फिरकला नाही. यामुळे व्यापाऱ्यांनी दररोजचे लिलाव सुरु केले. चांदवड प्रमाणेच देशातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ असलेल्या लासलगाव आणि अन्य बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी सुरु होऊ शकली नाही. यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या काही दिवसांत कांद्याचे भाव प्रति किलो ५० पैसे १ रुपयांपर्यंत खाली घसरले. यामुळे मोठे नुकसान झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आक्रोश व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील १५ बाजार समित्यांमधून नाफेड आणि



एनसीसीएफच्या माध्यमातून २ लाख टन कांदा खरेदी केली जाणार आहे. ही खरेदी प्रतिक्विंटल १,५८० रुपये दराने होणार आहे. पण पहिल्याच दिवशी बहुतांश ठिकाणी कांदा खरेदी सुरु झाली नसल्याचे दिसून आले. अधिक मिळालेल्या माहितीनुसार, केवळ निफाड उपबाजार समितीत एका संस्थेने कांदा खरेदी सुरु केली आहे. पण लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत कांदा खरेदी झालेली नाही. दरम्यान, आज नाफेडकडून होणाऱ्या खरेदीच्या पार्श्वभूमीवर भाव वाढणे अपेक्षित होते. पण आठवड्याच्या पहिल्याच दिवशी कांद्याचे भाव क्विंटलमागे दोनशे ते तीनशे रुपयांनी कमी झाल्याचे दिसून आले. पिंपळगाव बसवंत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत आज उन्हाळ कांद्याचा सरासरी भाव प्रतिक्विंटल १,६०० रुपये होता. यावरुन महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांकडून कांदा खरेदीची घोषणा आणि प्रत्यक्षात खरेदी यात तफावत दिसून येत आहे. कांदा खरेदीला विलंब झाल्यास शेतकऱ्यांचे अधिक नुकसान होऊ शकते. कारण कांदा सडू लागला आहे. नाशिकसह राज्यातील अन्य ठिकाणीही शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी सुरु करायला हवी, असे दिघोळे यांनी म्हटले आहे. राज्यातील कांदा प्रश्नी मे महिन्याच्या अखेरीस केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा आणि कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासोबत बैठक झाली होती. त्यात नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी व्यापाऱ्यांकडून नाही तर शेतकऱ्यांकडून केली पाहिजे, अशी मागणी केली होती. या मागणीवर सहमती दर्शवली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. तसेच राज्यातून १० लाख टन कांदा खरेदीची मागणीही करण्यात आली आहे. पण अद्याप त्यावर निर्णय झालेला नाही.

## पॉलीहाऊस उभारण्यापूर्वी हे तपासा, अन्यथा मोठे नुकसान

अलीकडच्या काही वर्षात पॉलिहाऊसमधील शेतीचे प्रमाण वाढले आहे. पॉलिहाऊसमुळे अति उष्णता, थंडी किंवा पावसाचा पिकांवर कमी परिणाम होतो. त्यामुळे पीक संरक्षित राहते आणि त्याची वाढ चांगली होते. यामुळे शेतकऱ्यांना वर्षभर शेती करणे शक्य होते.

पॉलीहाऊस उभारण्यापूर्वी माती आणि पाण्याची तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर माती योग्य नसेल, तर पीक चांगले येणार नाही. त्यामुळे, माती पोषक आणि लागवडीसाठी योग्य आहे की नाही, हे प्रथम तपासले जाते.

जमिनीचा पीएच आणि पोषक तत्त्व : जमिनीचा पीएच संतुलित असावा. जर जमीन खूप आंबट किंवा खूप कडू (आम्लधर्मी किंवा अल्कधर्मी) असेल, तर वनस्पतींची योग्य वाढ होत नाही. याव्यतिरिक्त, जमिनीत नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियम यांसारखी आवश्यक पोषक तत्त्वे असावीत. यामुळे वनस्पती मजबूत होतात आणि चांगले पीक येते.

पाणी आणि मातीचे संतुलन : मातीतील योग्य ओलावा अत्यंत महत्त्वाचा आहे. जास्त कोरड्या मातीमुळे रोपे कमकुवत होतात आणि जास्त पाण्यामुळे मुळांना इजा होऊ शकते. त्यामुळे, मातीत पाणी जास्तही नसावे आणि कमीही नसावे. शिवाय, मुळांना हवा मिळण्यासाठी मातीतून अतिरिक्त पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे.

पॉलीहाऊस शेतीचे फायदे : पॉलीहाऊसमध्ये पिके अधिक वेगाने आणि चांगल्या प्रकारे वाढतात. त्यांना कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो, त्यामुळे ती सुरक्षित राहतात. यामुळे शेतकऱ्यांना कमी श्रमात अधिक उत्पन्न मिळवता येते. पॉलीहाऊसमध्ये भाजीपाला, फुले आणि अधिक मूल्यवान पिके सहजपणे घेता येतात, ज्यामुळे उत्पन्न वाढते. जर शेतकऱ्यांनी चांगली माती आणि पॉलीहाऊस तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला, तर ते कमी खर्चात अधिक पिके घेऊ शकतात. योग्य माती, योग्य पाणी आणि सुरक्षित वातावरण या सर्वांमुळे शेती सोपी आणि फायदेशीर बनते.



## फळबागेत फुलांचे आंतरपीक : फायदे आणि घ्यायची काळजी

आंतरपीक ही संकल्पना मुळात मुख्य पिकाच्या बाबतीतली जी काही जोखीम असते ती कमी करण्यासाठीचा एक उत्तम उपाय आहे. फळबागांमध्ये देखील विविध प्रकारच्या फुलांची लागवड करून उत्तम कमाई करता येऊ शकते. आपल्याला माहित आहे की फळझाडांची लागवड ही जास्त अंतरावर केलेली असते त्यामुळे फुल पीक लागवडीसाठी एक चांगला स्कोप असतो. फळबागांमध्ये अर्धवट सावली आवश्यक असणाऱ्या पिकांची निवड खूप महत्त्वाचे ठरते. फुल पिकांची लागवड मुख्य पीक म्हणून न करता जर आंतरपीक म्हणून केली तर खूप फायद्याचे ठरू शकते. फळबागेत फूल पिकांचा अंतर्भाव केला तर नक्कीच आर्थिक फायदा जास्तीचा होतो.

फळबागेत आंतरपीक : आंबा, चिकू, सिताफळ, द्राक्ष, संत्रा आणि डाळिंब सारख्या फळबागेत झाडांचे अंतर जास्त असते त्यामुळे फुल पिकाची लागवड या अत्यंत कार्यक्षम रीतीने करता येते. बऱ्याच प्रयोगातून सिद्ध देखील झाले आहे की जर फुल पिकांचा आंतरपीक म्हणून समावेश केला तर मुख्य पिकाच्या उत्पन्नावर किंवा त्याच्या गुणवत्तेवर कुठल्याही प्रकारचा अनिष्ट परिणाम होत नाही.

आंतरपीक घेण्याचे फायदे : फुल पिकांची आंतरपीक म्हणून लागवड करायची असेल तर महत्त्वाचा फायदा म्हणजे याची आवश्यकता आणि



मागणीनुसार मुख्य पिकांमध्ये लागवड करता येते व या फळपिकांचा सापळा पीक म्हणून देखील चांगला उपयोग करता येतो. तसेच फळ बागांमधील दोन झाडांच्या मध्ये जिथे मोकळी जागा असते त्याचा फूल पिकांच्या लागवडीसाठी उत्तम पद्धतीने वापर शक्य होतो. त्यामुळे कमी कालावधीत पिकांपासून चांगले उत्पादन मिळते. तसेच आपण जेव्हा दोन फळपिकांच्या झाडांमध्ये असलेल्या मोकळ्या जमिनीत जेव्हा फुल पिकांची लागवड करतो तेव्हा तणाचा प्रादुर्भाव होत नाही व त्यामुळे तणनियंत्रणासाठी चा खर्च कमी होतो.आंतरपीक घेताना काळजी : सर्वात महत्वाचे म्हणजे जेव्हा तुम्ही फुल पिकांची आंतरपीक म्हणून लागवड कराल तेव्हा मुख्य पीक व आंतरपीक यांचा वाढीचा कालावधी नेमका किती आहे, याचा अभ्यास करूनच निवड करणे गरजेचे आहे. आता यामध्ये उदाहरणच द्यायचे झाले तर तुम्ही जर लिली या फुलाची लागवड बटाट्यासारख्या कंदवर्गीय पिकासोबत केली तर ते यशस्वी होत नाही कारण

लिली हे कंदवर्गीय पीक आहे व बटाटा देखील कंदवर्गीय आहे. तसेच आपण फळ बागेमध्ये मशागतीसाठी बर्याचदा ट्रॅक्टर सारखे यंत्राचा वापर करत असतो त्यामुळे आंतरमशागत करताना ट्रॅक्टर फिरण्यासाठीची जागा वगैरे इत्यादी गोष्टी लक्षात घेऊनच लागवडीचे नियोजन करणे महत्त्वाचे असते. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा तुम्ही फळबागेत फुलांच्या आंतरपीक म्हणून लागवड कराल तेव्हा फळांचा हंगाम लक्षात घेऊनच लागवड करणे गरजेचे आहे.

## हळद लागवडीसाठी शिका नवे तंत्र

हळद पिकांत उत्पन्नाचा मुख्य स्रोत जमिनीत वाढणारा कंद असतो. त्यामुळे लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड महत्त्वाची ठरते. मध्यम प्रतीची, काळी, पाण्याचा निचरा होणारी जमीन हळद पिकासाठी योग्य असते. पाण्याचा ताण व जास्त पाऊसमान हे पीक काही काळ सहन करू शकते. मात्र, जास्त पिकात पाणी साचून राहिल्यास पिकावर विपरित परिणाम दिसून येतात. पाण्याचा निचरा न झाल्यास कंदकुज होण्याची शक्यता असते. हळद पिकाच्या वाढीसाठी सरासरी २५ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान वाढीसाठी आवश्यक असते. उगवणीसाठी ३० ते ३५ अंश सेल्सिअस, फुटवे फुटण्यासाठी २५ ते ३० अंश सेल्सिअस, कंद वाढीसाठी २० ते २५ अंश सेल्सिअस, तर कंद पोसण्यासाठी १८ ते २० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. कोरडे व थंड हवामान कंद वाढीस पूरक ठरते. जास्त तापमान असलेल्या भागात तापमानाची तीव्रता कमी झाल्यानंतरच हळद लागवड करावी. अन्यथा, कमाल तापमानामुळे उगवणीवर विपरित परिणाम होतो.

सुधारित वाण :हळद लागवडीसाठी फुले हरिद्रा, फुले स्वरूपा, सेलम, राजापुरी, कृष्णा, टेकुरपेटा, वायगाव, आंबे हळद हे सुधारित वाण विकसित करण्यात आले आहेत. याशिवाय भारतीय मसाला पिके संशोधन केंद्र, कोझीकोड (केरळ) यांनी सुवर्णा, सुगुणा, सुदर्शना, प्रभा, आयआयएसआर प्रतिभा, आयआयएसआर केदारम हे वाण विकसित केल्या आहेत. तसेच तमिळनाडू कृषी विद्यापीठ, कोईंमबतूर यांच्यामार्फत बीएसआर-१, बीएसआर-२ हे वाण विकसित करण्यात आले आहेत. लागवडीसाठी सुधारित वाणांची निवड महत्त्वाची आहे.

लागवड पद्धती :पाणी देण्याच्या पद्धतीनुसार हळद लागवडीच्या प्रामुख्याने सरी- वरंबा आणि



रुंद वरंबा या दोन पद्धती आहेत.

१) सरी - वरंबा पद्धत :पाटपाणी पद्धतीने सिंचन द्यावयाचे असल्यास सरी- वरंबा पद्धतीने लागवड करावी. या पद्धतीने लागवडीसाठी ७५ ते ९० सें.मी. अंतरावर सरी पाडून घ्यावी. त्यापूर्वी स्फुरद आणि पालाशची मात्रा जमिनीत द्यावी. कारण स्फुरद आणि पालाश खते जमिनीत दिल्यानंतर पिकांस लगेच उपलब्ध होत नाहीत. जमिनीच्या उताराप्रमाणे ६ ते ७ सरी वरंब्याचे एक वाकुरे या प्रमाणे वाकुरी बांधून घ्यावी. वाकुऱ्याची लांबी ही शेताची लांबी आणि जमिनीचा उतार लक्षात घेऊन ५ ते ६ मीटर ठेवावी. सोईप्रमाणे पाणी व्यवस्थित बसण्यासाठी पाण्याचे पाट सोडावेत.

२) रुंद वरंबा पद्धत :ठिबक सिंचन सारख्या आधुनिक सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास रुंद वरंबा पद्धतीने लागवड फायदेशीर ठरते. रुंद वरंबा तयार करताना १२० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात. नंतर त्या सऱ्या उजवून ६० ते ७५ सें. मी. माथा असलेले २० ते ३० सें.मी. उंचीचे व उताराचे प्रमाण लक्षात घेऊन योग्य लांबी रुंदीचे वरंबे (गादीवाफे) तयार करावेत.

लागवड वेळ आणि पद्धत :लागवड जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. लागवडीस उशीर होईल तसा उत्पादनावर परिणाम होतो. एक हेक्टर क्षेत्रावर लागवडीसाठी २५ क्विंटल जेठे गड्डे (म्हणजेच मातृकंद आकाराने त्रिकोणाकृती) बेणे पुरेसे होते. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जेठे गड्डे वापरावेत. बेणे वजनाने ५० ग्रॅमपेक्षा अधिक, सशक्त, निरोगी, रसरशीत, नुकतीच सुप्तावस्था संपवून थोडेसे कोंब आलेले असावे. जेठे गड्डे उपलब्ध होत नसतील, तर बगल गड्डे (४० ते ५० ग्रॅम वजनाचे) किंवा हळकुंडे (वजनाने ३० ग्रॅमपेक्षा मोठे) बेणे म्हणून वापरावे. निवडलेली हळकुंडे ठळक, लांब, जाड, ठसठशीत वाढलेली, निरोगी आणि एकसमान (भेसळमुक्त) असावीत. हळकुंडे जमिनीमध्ये समांतर वाढतात. अशावेळी दोन ओळींत शिफारस केल्याप्रमाणे पुरेसे अंतर ठेवावे. लागवड जमिनीच्या समांतर करावी.

लागवडीपूर्वी बेण्यास रासायनिक आणि जैविक बेणेप्रक्रिया अवश्य करावी. प्रथम रासायनिक बेणेप्रक्रिया करून नंतर जैविक बेणेप्रक्रिया करावी. कोणत्याही परिस्थितीत जैविक बेणेप्रक्रिया रासायनिक प्रक्रिये अगोदर करू नये. रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीमध्ये दोन ते तीन दिवस सुकवून नंतर जैविक बीजप्रक्रिया करावी.

खत व्यवस्थापन :हळद पिकांस सेंद्रिय खतांचा भरपूर पुरवठा केल्यास उत्पादन वाढीस मदत मिळते. त्यासाठी पूर्वमशागतीवेळी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ३५ ते ४० टन प्रमाणे चांगले मिसळावे. शेणखतामुळे गड्ड्यांची वाढ चांगली होते. पुरेसे शेणखत उपलब्ध नसल्यास, इतर सेंद्रिय निविष्ठांचा वापर करावा. हळद पिकास हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश देण्याची शिफारस आहे. संपूर्ण स्फुरद आणि पालाश लागवडीवेळी, तर नत्राची मात्रा २ समान हप्त्यांत विभागून द्यावी. नत्राचा पहिला हप्ता (१०० किलो नत्र) लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावे. त्यासोबत फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेट प्रत्येकी १२ किलो द्यावे. नत्राचा दुसरा हप्ता म्हणजेच १०० किलो नत्र भरणीवेळी (लागवडीनंतर २.५ ते ३ महिन्यांनी) द्यावे.

पाणी व्यवस्थापन :हळद पिकास सुरुवातीच्या काळ हा मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी लगेच ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. हलक्या ते मध्यम जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. सिंचन कमी पडले तर कंदांची योग्य वाढ होत नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२४ : पेरू येथे भूकंप.
१६५८ : मुघल शासक औरंगजेब यांनी आग्र्याचा किल्ला काबीज केला
१६७० : पुरंदरच्या तहात गमावलेला रोहिडा किल्ला शिवाजी महाराजांनी परत जिंकून घेतला.
१७०७ : औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुअज्जम आणि आझमशाह या त्याच्या दोन मुलांमधे दिल्लीच्या तख्तासाठी युद्ध झाले. यात मुअज्जमने आझमशाहला ठार करुन दिल्लीची गादी बळकावली.
१७१३ : मुघलांनी १६८९ मधे जिंकलेला रायगड किल्ला पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीकडुन राजकारणाने जिंकुन घेतला.
१७८३ : आईसलँड मधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक, हजार ठार.
१९१२ : कार्ल लेम्ले यांनी यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीची स्थापना केली.
१९१५ : टिळकांनी मंडाले तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असताना 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून पुर्ण केला.
१९१५ : लो. टिळक यांचे मंडालेच्या तुरुंगातून सुटका.
१९१८ : नोव्हा ॲक्विला या सर्वाधिक तेजस्वी तेजोमेघाचा शोध.
१९४१ : दुसरे महायुद्ध  दोस्त राष्ट्रांनी सीरीया व लेबानॉन पादाक्रांत केले.
१९४८ : भारत व इंग्लंड यांच्या दरम्यान एअर-इंडियाची हवाई सेवा सुरु.
१९४८ : जॉर्ज ऑर्वेलची १९८४ या नावाची कांदबरी प्रसिद्ध झाली.
१९५३ : कृष्णवर्णीयांना हॉटेलमधे सेवा नाकारण्यास अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली.
१९६८ : बर्मोडा देशाने संविधान अंगिकारले.
१९६९ : लष्करप्रमुख म्हणून सॅम माणेकशा यांची नियुक्ती.
१९९२ : पहिल्यांदा जागतिक महासागर दिन साजरा केला गेला.
२००४ : आधुनिक काळातील शुक्राचे (सूर्यावरुन) पहिले अधिक्रमण झाले. याआधीचे अधिक्रमण १८८२ या वर्षी झाले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९०६ : भारतीय क्रिकेट खेळाडू सैयद नझीर अली यांचा जन्म.
१९१० : दिनकर केशव बेडेकर, तत्त्वचिंतक, समीक्षक, लेखक (मृत्यू: २ मे १९७३)
१९१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट २०१५)
१९१७ : गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकार. (मृत्यू: २ एप्रिल २००९)
१९२१ : इंडोनेशिया देशाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष सुहार्तो यांचा जन्मदिन.
१९२५ : बार्बरा बुश, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुशची पत्नी व जॉर्ज डब्ल्यु. बुशची आई.
१९३२ : सैयद नझीर अली, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९३६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भैतिकशास्त्रज्ञ केनिथ गेडीज विल्सन यांचा जन्म.
१९५५ : वर्ल्ड वाईड वेब चे जनक टिम बर्नर्स-ली यांचा जन्म.
१९५७ : चित्रपट अभिनेत्री डिंपल कपाडिया यांचा जन्म.
१९७५ : शिल्पा शेट्टी, भारतीय अभिनेत्री आणि निर्माता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३२ : इस्लाम धर्माचे संस्थापक मोहंमद पैगंबर यांचे निधन.
१७९५ : फ्रान्सचा राजा लुई १७ वा यांचे निधन. (जन्म: २७ मार्च १७८५)
१८०९ : अमेरिकन विचारवंत राजकारणी थॉमस पेन यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १७३७)
१८४५ : अमेरिकेचे वे७ राष्ट्राध्यक्ष ॲन्ड्रयू जॅक्सन यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १७६७)
१९९५ : रंगभूमी कलावंत एकपात्री प्रयोगकार राम नगरकर यांचे निधन.
१९९८ : नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष सानी अबाचा यांचे निधन.
२००९ : लोकप्रिय भारतीय उर्दू-हिंदी नाटककार, चित्रपट दिग्दर्शक, कवी आणि अभिनेता हबीब तनवीर यांचे निधन.

## ऑनलाइन खतविक्रीची सक्ती शिथिल करा - राजू शेट्टी



कोल्हापूर / प्रतिनिधी

केंद्र सरकारने खत विक्रीत पारदर्शकता आणण्यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणाली, फार्मर आयडी आणि नवीन ई-पॉस मशिनद्वारे खत विक्री अनिवार्य केली आहे. मात्र, या प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, ऐन पेरणीच्या हंगामात ऑनलाइन खतविक्रीची सक्ती शिथिल करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली आहे.

ग्रामीण भागात इंटरनेट नेटवर्कची समस्या, सर्व्हर वारंवार डाऊन होणे आणि बायोमेट्रिक पडताळणीतील अडचणी यामुळे खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. ई-पीक पाहणी किंवा ॲग्रीस्टॅकमधील माहिती अद्ययावत नसल्यास आवश्यक खत मिळत नसल्याची तक्रार आहे. अनेकदा विक्रेत्यांकडे खतसाठा उपलब्ध असूनही तांत्रिक बिघाडामुळे तो पोर्टलवर दिसत नसल्याने कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे. याशिवाय, काही विक्रेते युरिया व डीएपीसारख्या खतांसोबत इतर विनाअनुदानित उत्पादने खरेदी करण्याची सक्ती करत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. वयस्कर, आजारी आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही या प्रक्रियेमुळे अडचणी येत आहेत. शासनाने तंत्रज्ञानाचा वापर शेतकरीहिताचा ठेवून पर्यायी व्यवस्था करावी व खतांसोबतची सक्तीची विक्री तात्काळ बंद करावी, अशी मागणी शेट्टी यांनी केली आहे.



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

बुधवार दि.१० जून २०२६





# जावईबापूचा धोंडा सोन्याच्या अंगठीसह मांजरीने गिळला

## डॉक्टरांच्या प्रयत्नानंतर मांजरीच्या पोटातील अंगठी मिळाली पण मांजरीला जीव गमावा लागला

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवण गावात जावयासाठी आणलेली सोन्याची अंगठी मांजरानेच गिळल्याची अजब घटना घडली. चार दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पोटातन अगठी बाहेर काढण्यात आली ; मात्र यात मांजराला प्राण गमवावे लागले.

एका पिठाच्या धोंडयात (खाद्यपदार्थ) लपवून ठेवली होती.घरात जावईबापूंचे स्वागत आणि पाहणचार मोठ्या थाटामाटात सुरू होता. सर्वजण आनंदात मग्न असतानाच. घरातील मांजराने तो पिठाचा धोंडा अन्न समजून फस्त केला. धोंड्यासोबतच त्यातील ५ ग्रॅम सोन्याची अंगठीह माजराच्या पोटात गेली. हा प्रकार काही वेळातच कुटुंबाच्या लक्षात आला आणि आनंदाच्या वातावरणात अचानक चिंतेच सावट पसरल. जावयाचं कपडं देऊन बोळवण



केली; मांजराने आंगठी गिळल्याचे समजताच घरातील पुरुषांनी तातडीने त्या मांजराला पकडून एका जागी बाधून ठेवले. जावईबापूनाही घडलेला हा अजब प्रकार सांगण्यात आला. अखेर. सोन्याची अगठी नतर देण्याचे ठरवून लेक-जावयाला कपडे आणि इतर आहेर देऊन त्यांची बोळवण करण्यात आली. पण खरी डोके दुखी पुढे सुरू झाली. मांजराच्या विष्ठेद्वारे सोन्याची अंगठी नैसर्गिकरीया बाहेर पडेल, या आशेने कुटंबाने मांजराला सलग चार दिवस घरात बांधून ठेवले. मात्र, चार दिवस उलटूनही अंगठी बाहेर आली नाही, अखेर कटाळून कुटुबाने माजराला पशूवैद्यकीय रुग्णालयात सध्या राज्यात अधिक मासाचा (धोंड्याचा) महिना सुरू आहे. लेक-जावयाचा पाहणचार, गोडधोड जेवण आणि सोन्या-नाण्याचे आहेर याम ळे सासुखाडीला सध्या प्रचंड उत्साह असतो. मात्र, बीड जिल्ह्यातील टाकरवण परिसरात एका जावयाला देण्यासाठी आणलेली सोन्याची अंगठी चक्क घरातील मांजरानेच गिळल्याची धक्कादायक आणि अजब घटना समोर आली आहे, बाब म्हणजे, ४ दिवसाच्या प्रतीक्षेनंतर मांजराचे पोट चिरून अंगठी तर बाहेर काढण्यात आली. मात्र या संपर्ण प्रकारात त्या अजाण मांजराला आपले प्राण गमवावे लागले आहेत. टाकरवण परिसराजवळील एका गावात राहणाऱ्या कुटंबाने अधिक मासानिमित्त लेक आणि जावयाला धोंडे जेवणासाठी आमंत्रित केले होते . सासूबाईंनी परंपरेप्रमाणे जावयाला सुखद धका देण्यासाठी आणि आहेर करण्यासाठी ५ ग्रेम सोन्याची अंगठी बनवून घेतली होती. त्यांनी ही अंगठी गुपचूप नेली, डॉक्टरांनी मांजराला उलटी होण्याचे औषध दिले. या वेदनादायी उपचारादरम्यान मांजराला प्रचंड त्रास सहन करावा लागला आणि उपचारा दरम्यानच त्या अजाण मांजराचा मृत्यू झाला .

# सर्वजनिक सेवकां विरुद्ध कोणत्या तक्रार करू शकतात

### भ्रष्टाचार विरोधी जनजागृती बैठक संपन्न



जालना। प्रतिनिधी

केंद्रीय अन्वेषण ब्यूरो, लाचलुचपत प्रतिबंधक शाखा पुणे यांच्या वतीने सोमवारी दुपारी २ ते ३ यावेळेत जालना शहरातील अंबड चौफुली परिसरातील संजीवनी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये भ्रष्टाचार विरोधी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

नागरिकांमध्ये पारदर्शकता वाढवणे, नैतिक प्रशासनाला पाठबळ देणे आणि लाचखोरीला खंबीरपणे नाही म्हणण्याची प्रवृत्ती निर्माण करणे या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात पोलिस उपनिरीक्षक उपेंद्रकुमार यांनी डॉक्टर्स, पत्रकार व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी डॉ. बळीराम बागल, डॉ. कैलास राजगुरु, पोलिस कर्मचारी हरीभाऊ लोहकरे आदींची उपस्थिती होती.सीबीआयच्या टीमने जालना जिल्ह्यासह आपल्या अखत्यारीत येणाऱ्या महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांमधील नागरिकांना भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवण्याचे आवाहन करण्यात आले. सार्वजनिक सेवकांविरुद्ध कोणत्या बाबींवर तक्रार करता येऊ शकते, याची सविस्तर माहिती देण्यात आली. प्रामुख्याने कोणत्याही शासकीय कामासाठी लाच मागणे (अवाजवी लाभ), लोकसेवकांकडून होणारे गुन्हेगारी गैरवर्तन आणि सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची त्यांच्या अधिकृत उत्पन्नापेक्षा जास्त असणारी बेहिशोबी मालमत्ता यांसारख्या गंभीर विषयांवर नागरिक थेट सीबीआयकडे तक्रार नोंदवू शकतात, असे सांगण्यात आले. हा नियम केवळ केंद्र सरकारच्या मुख्य कार्यालयानाच लागू नसून केंद्र सरकारच्या अखत्यारीत येणारे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, रेल्वे, जीएसटी, इन्कम टॅक्स, स्वायत्त संस्था आणि केंद्र सरकारकडून आर्थिक अनुदान मिळणाऱ्या संस्था किंवा उपक्रमांनाही लागू आहे.

त्यामुळे या सर्व विभागांमधील भ्रष्टाचाराविरुद्ध नागरिकांनी न भिता पुढे येणे गरजेचे आहे. भ्रष्टाचाराच्या विरोधात तक्रार करणे सुलभ व्हावे यासाठी सीबीआय एसीबी पुणे विभागाने आपले अधिकृत संपर्क तपशीलही यावेळी जाहीर केले.

# तहसीलदार विजय चव्हाण लाच प्रकरणी तक्रारदार संयोग सोळुंके अटक

अंबड। प्रतिनिधी

अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांच्या लाचप्रकरणानंतर महसूल व पोलिस प्रशासनाने अवैध वाळू व्यवसायाशी संबंधित व्यक्तींविरोधात कारवाईचा बडगा उगारला असून, तहसीलदार लाचप्रकरणातील तक्रारदार व वाळू प्रकरणातील फरार सुयोग मधुकर सोळुंके (वय ३६, रा. गोंदी, ता. अंबड) याला पोलिस अधीक्षकांचे पथक व गोंदी पोलिसांनी रविवारी मध्यरात्री त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.

सोमवारी आरोपीला अंबड न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांकडून त्याची सखोल चौकशी सुरू आहे. सोळुंके याच्यावर अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील तीन गुन्हे दाखल असून, २०२५ च्या वाळू प्रकरणात तो फरार होता. तसेच वाळूचे वाहन पळून नेणे. महसूल विभाग व पोलीस प्रशासनाची दिशाभूल करून फसवणूक करणे असे आणि गुन्हे संयोग सोळुंके विरोधात आहे.



गेल्या काही दिवसांपासून त्याचा शोध सुरू होता.

सोळुंकेने सोशल मीडियावर ''वन डाऊन, मोअर टू गो'' असे स्टेटस ठेवल्याची चर्चा होती. मात्र, त्याच रात्री गोंदी पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. दरम्यान, आतापर्यंत पोलिसांना संशयित कसा सापडत नव्हता, असा सवाल उपस्थित केला जात आहे. यापूर्वी झाली स्थानबद्धतेची कारवाई सुयोग सोळुंके याच्यावर यापूर्वी प्रशासनाने एक वर्षासाठी स्थानबद्धतेची कारवाई केली होती. त्यानंतर तो जामिनावर बाहेर आला होता. पुढे वाळू टेंडर प्रक्रियेत त्याचा सहभाग असल्याची चर्चा परिसरात होती. याच काळात त्याने पोकलेन व हायवा सुरू ठेवण्यासाठी जबरदस्तीने प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. लाच प्रकरणी जाणून बुजून प्रकरण घडून आणल्याचे बोलल्या जात आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ पोर्टलद्वारे

### फार्मर आयडी बंधनकारक : कर्जमाफीस पात्र असूनही लाभ मिळणार नाही - दिलीप तिजोरे

जामखेड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीला वेग आला असून पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ ऑनलाइन पोर्टलद्वारे वितरित करण्यात येणार आहे. त्यामुळे जामखेड तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन सहकार विभागाकडून करण्यात आले आहे.

जामखेड तालुक्यातील सुमारे दहा हजार शेतकरी या कर्जमाफी योजनेच्या कक्षेत येण्याची शक्यता असून लाभार्थ्यांची पडताळणी डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. यासाठी शेतकऱ्यांची जमीन, आधार क्रमांक, बँक खाते, माहिती नोंद फार्मर आयडीशी संलग्न असते. शासनाने कर्जमाफी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक करण्यासाठी डिजिटल पडताळणी प्रणालीचा अवलंब केला असून त्यामध्ये फार्मर आयडीला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे.तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी नोंदणी केलेली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पात्र असूनही काही शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी प्रशासनाकडून जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आणि जमिनीच्या नोंदीसह नजीकच्या सेवा केंद्रात किंवा ऑनलाइन माध्यमातून फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र ठरलेल्या सर्व खातेदारांना पोर्टलद्वारे कर्जमाफीचा लाभ दिला जाणार आहे. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी असणे बंधनकारक आहे. ज्या पात्र शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी उपलब्ध नसेल, त्यांना कर्जमाफीस पात्र असूनही लाभ मिळू शकणार नाही. त्यामुळे तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करून घ्यावी, जेणेकरून कर्जमाफीच्या लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही.

# जलकवच अभियानची अंमलबजावणी करण्याच्या सूचना

### जिल्हाधिकाऱ्यांकडून ग्रामसेवक व अधिकाऱ्यांचा व्हीसीद्वारे आढावा

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यात संभाव्य कमी पर्जन्यमान, पाणीटंचाई व भूजल पातळीतील घट यांचा विचार करून जिल्हा प्रशासनामार्फत ''जालना जलकवच अभियान२०२६'' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली.

सदर बैठकीस जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी श्री शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्रीमती मनिषा दांडगे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री संदीप पवार यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक तसेच कृषी, पाणीपुरवठा व इतर संबंधित विभागांचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पाणीस्थितीचा नियमित आढावा घेऊन आवश्यक अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा. गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत स्तरावर अभियानातील सर्व उपक्रमांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी. संबंधित विभागांनी निश्चित कालमर्यादेत कामांची पूर्तता करून प्रगती अहवाल सादर करावेत.''पाणी ही सामूहिक जबाबदारी आहे. जलव्यवस्थापन, पाण्याचा काटकसरीने वापर आणि ग्रामस्तरावरील सक्रिय सहभाग यांच्या माध्यमातून संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीवर प्रभावी मात करता येईल. सर्व विभागांनी व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी अभियानाला सर्वोच्च प्राधान्य देऊन तात्काळ कार्यवाही करावी,'' असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

# मंठा येथे दायमा परिवाराकडून दमा औषधाचे मोफत वाटप; १२५ वर्षांपासून परंपरा कायम

मंठा । प्रतिनिधी

येथील दायमा परिवाराच्या वतीने सोमवार (ता. ८) रोजी दुपारी १ : ३३ वाजता मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात आले. मागील शंभर ते सव्वाशे वर्षांपासून दायमा परिवाराच्या वतीने दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात येते. या परिवारातील तिसऱ्या पिढीकडून सध्या औषध वाटपाची परंपरा सुरू आहे. सध्या या परिवारातील सोमनाथ दायमा, संतोष दायमा आणि पप्पू दायमा दमा असलेल्या रुग्णांना औषधीचे वाटप करतात. जून मधील मृग



नक्षत्र व कोजागिरी पौर्णिमेला असे दोन वेळेस दमा असलेल्या रुग्णांना मोफत औषधीचे वाटप करण्यात येते.

ही आयुर्वेदिक औषधी घेण्यासाठी मुंबई, ठाणे, बार्शी, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, चिखली, बुलढाणा, परभणी व परतुर - मंठासह जालना जिल्ह्यातील रुग्ण मोठ्या संख्येने येतात. दमा असलेल्या रुग्णांना श्री रेणुका देवी मंदिर परिसरात औषधीचे वाटप करण्यात आले. औषधी वाटप करण्यासाठी उमेश दायमा, संतोष तिवारी, दिनेश दायमा, गोविंद दायमा, कपिल तिवारी, गोपाल दायमा, शुभम दायमा, सौरभ दायमा, कृष्णा चिंचणे, रमण दायमा, अनुराग कासट, कृष्णा मणियार, साईराज रामपूरकर, सोमेश चोकडा, यश तिवारी, सुदर्शन भुतडा, मधुर मणियार यांनी परिश्रम घेतले. दमा रुग्णांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नगराध्यक्षा सौ वंदनाताई वैजनाथ बोराडे यांनी केली. तसेच रुग्णांच्या नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.


**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड - विभाग )**

**ता. आष्टी जि. बीड**

Email id-tahsildarashti@gmail.com

**दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२**

**क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-**

**दि.०९/०६/२०२६**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे ता.आष्टी जि, बीड यांना जाहीर केले जाते की अर्जदार नामे वैशाली शंकर गाडे रा कडा ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे नामे, निकिता शंकर गाडे रा कडा ता. आष्टी जि.बीड याची जन्म/ मृत्यू दि. ०४/१२/२०१० रोजी मोजे. कडा ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यूत्ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड - विभाग )**

**ता. आष्टी जि. बीड**

Email id-tahsildarashti@gmail.com

**दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२**

**क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-**

**दि.०९/०६/२०२६**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे ता.आष्टी जि, बीड यांना जाहीर केले जाते की अर्जदार नामे वैशाली शंकर गाडे रा कडा ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे नामे, धनश्री शंकर गाडे रा कडा ता. आष्टी जि.बीड याची जन्म/ मृत्यू दि. २८/०५/२००८ रोजी मोजे. कडा ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यूत्ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी


# सरकारी जागेवर अतिक्रमण; सरपंचपद रद्द करण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांच्या विरोधात तुकाराम धनु राठोड यांनी एल्गार पुकारला असून सरपंचाने गावातील सरकारी जागेवर सिमेंट काँक्रीटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याचा मंठा तालुका प्रशासनाचा अहवाल असताना जिल्हाधिकाऱ्याकडून अद्याप संबंधित सरपंचावर अपात्रतेची कारवाई करण्यात आलेली नाही. तक्रारदारास तारीख पे तारीख देऊन जिल्हा प्रशासन दोन वर्षापासून चालढकलपणा करीत असल्याचे दिसून येते. देवाभाऊच्या राज्यात जिल्हाधिकारी न्याय देणार का ? असं प्रश्न उपस्थित केला जात आहे.यासंदर्भात तक्रारदार तुकाराम धनु राठोड यांनी सरपंच सुभाष दासू चव्हाण यांचेविरुद्ध सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याची तक्रार गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा यांच्याकडे सन २०२४ मध्ये केली होती. गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांनी पंचनामा करून सरपंचाने सरकारी जागेवर अतिक्रमण केल्याचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी प्रशासनाकडे दिलेला असून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम १४ (१), (ज - ३) विवाद अर्ज तक्रारदार यांनी गैर अर्जदार सरपंच सुभाष दासू चव्हाण यांचे विरुद्ध मा. जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात सादर केल्यानंतरही सरपंच सुभाष दासू चव्हाण यांना सरपंच पदावरून अद्याप पर्यंत अपात्र करण्यात आलेले नाही.

तक्रारदार तुकाराम धनु राठोड यांनी एवढ्यावरच न थांबता सरपंच सुभाष दासू चव्हाण यांच्या विरोधात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सुद्धा तक्रारी केल्या मात्र, त्यांना अद्याप पर्यंत न्याय मिळालेला नाही. तसेच माहोरा गावात मागील अनेक वर्षापासून सरपंचाच्या मर्जीने चालणारे अवैध दारू विक्री, जुगार अड्डे बंद करावेत अशी तक्रार तुकाराम धनु राठोड यांनी पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग जालना यांच्याकडे वेळोवेळी केल्यानंतरही कारवाई केली जात नाही. याउलट तक्रार का केली ? म्हणून गावातील पुतण्याच्या लग्नात सरपंच सुभाष दासू चव्हाण यांच्यासह सुखदेव पांडुरंग राठोड व दोन व्यक्तींनी तक्रारदारास व त्याच्या पत्नीस शिवीगाळ व मारहाण केली. सेवली पोलीस मात्र अर्थपूर्ण तडजोड करून थातूरमातूर कारवाई करीत संबंधित अवैध दारू विक्री व जुगार अड्डे चालविणाऱ्यांना पाठीशी घालतात. सरपंचाच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल असताना सेवली पोलीस स्टेशनला सरपंचाची कायमस्वरूपी उठबैस असते. सरपंच सुभाष दासू चव्हाण यांच्यासह त्याच्या नातेवाईकांकडून आपल्या व कुटुंबीयांच्या जीवितास धोका असून न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा तक्रारदार तुकाराम धनु राठोड यांनी दिला आहे.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र



# वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा: अंजनवतीत दोन सख्ख्या भावांची घरे जमीनदोस्त

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील अंजनवती परिसरात आज मंगळवार (दि. ९ जून) दुपारनंतर आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठा फटका बसला आहे. सायंकाळी सुमारे ४ वाजेनंतर झालेल्या जोरदार पावसामुळे अंजनवती येथील दोन सख्खे भाऊपंजाब स्वामी येडे आणि पंढरी स्वामी येडेयांची घरे पूर्णपणे कोसळून जमीनदोस्त झाली आहेत.**

वादळी वाऱ्याचा जोर इतका प्रचंड होता की काही क्षणांतच घरांच्या भिंती व छप्पर कोसळले आणि संपूर्ण घरांचे रूपांतर ढिगाऱ्यात झाले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे दोन्ही कुटुंबांना स्वतःचा जीव वाचवण्यासाठी धावपळ करावी लागली. घटनेदरम्यान घरात उपस्थित असलेल्या कुटुंबातील एका मुलीच्या डोक्याला दुखापत झाली असून तिला तातडीने बाहेर काढून उपचार देण्यात आले आहेत. तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे. या दुर्घटनेत दोन्ही कुटुंबांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घरात साठवलेले धान्यही पावसामुळे भिजून नष्ट झाले असून प्राथमिक अंदाजानुसार१५ क्विंटल तूर, ५ ते ६ क्विंटल ज्वारी,,९ ते १० क्विंटल गहू हे धान्यसाठे पूर्णपणे खराब झाले आहेत.





**धान्य, संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान, मुलगी जखमी**

तसेच घरातील पलंग, कपाट, भांडी, दरवाजे, पंखे, टीव्ही, कुलर, फ्रीज व इतर विद्युत उपकरणांचेही मोठे नुकसान झाले आहे. संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने दोन्ही कुटुंबांवर मोठे संकट ओढवले आहे.

घटनेनंतर ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य करत ढिगारा हटवण्याचे काम सुरू केले. दरम्यान, बाधित कुटुंबांना तातडीने शासकीय मदत, पंचनामा व नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

या अवकाळी पावसामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शेतकरी कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे.

ग्रामस्थांची मदत व प्रशासनाकडे मागणी

घटनेनंतर ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य सुरू करून ढिगारा हटवण्यास मदत केली. मात्र दोन्ही कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत व निवारा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. तसेच बाधित कुटुंबांना शासकीय मदत व तात्पुरता निवारा उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी जोर धरू लागली आहे.

घरातील व्यक्तींना इजा, मुलगी जखमी घटना घडली तेव्हा दोन्ही घरांमध्ये कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. कोसळलेल्या घराच्या ढिगाऱ्यात सापडल्याने एका शेतकऱ्याच्या मुलीच्या डोक्याला मार लागला असून तिला तातडीने बाहेर काढून प्राथमिक उपचार देण्यात आले. सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.

# आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याने सांगवी-खडकतसाठी स्वतंत्र ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वाळुंज, टाकळशिंग, सांगवी आष्टी, खडकत, पारगाव जोगेश्वरी, बळेवाडी, तवलवाडी तसेच एक्सप्रेस फीडरचा समावेश यापूर्वी एकाच ५ एमव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरवर होता. त्यामुळे वाढलेल्या वीजभारामुळे वारंवार फ्युज उडणे, लाईट ट्रिप होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच दिवसा शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा न मिळणे अशा समस्यांना शेतकरी व ग्रामस्थांना सामोरे जावे लागत होते.



**वीजभार विभाजनामुळे गावांच्या वीजपुरवठ्यात होणार सुधारणा; शेतकऱ्यांना मोठा दिलासा; आ.सुरेश धस यांचे मानले आभार**

या समस्येची गंभीर दखल घेत आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी महावितरणकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत आता सांगवी आष्टी व खडकत या गावांसाठी स्वतंत्र ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे.

या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे सांगवी आष्टी व खडकत या गावांचा ◀◀ पान ३ वर

# दूध संकलन केंद्रांवर अन्न व औषध प्रशासनाचे छापे; दोन ठिकाणचे नमुने प्रयोगशाळेकडे रवाना

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुधामध्ये भेसळ होत असल्याची चर्चा सुरू असतानाच, अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. दिनांक ८ जून रोजी आष्टी तालुक्यातील तवलवाडी आणि मंगरूळ या दोन ठिकाणच्या दूध संकलन केंद्रांवर अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने अचानक भेटी देऊन दुधाचे नमुने (सॅम्पल) ताब्यात घेतले आहेत. हे सर्व नमुने पुढील विश्लेषणासाठी संभाजीनगर येथील विभागीय प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले असून, येत्या पंधरा दिवसांत या नमुन्यांचा अहवाल येणे अपेक्षित आहे. हा प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील कडक कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाडे यांनी दिली आहे.

मागील काही वर्षांमध्ये तालुक्यात दुग्ध भेसळीची अनेक प्रकरणे उघडकीस आली होती; मात्र पुढे त्या प्रकरणांचे काय झाले, याचा कोणालाही थांगपत्ता लागला नव्हता. परंतु, अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंडे यांची नियुक्ती झाल्यापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अन्नभेसळ आणि नियमबाह्य औषध विक्री करणाऱ्यांवर धडक छापे टाकण्याचे सत्र सुरू झाले आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आष्टी तालुक्यात ही धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान पारदर्शकता राहावी आणि कोणताही घोळ होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या या पथकामध्ये दुग्धविकास अधिकारी कार्यालयाचे अधिकारी, पोलीस कॉन्स्टेबल आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांचा प्रामुख्याने समावेश होता. संकलन केंद्रांवरून दुधाचे नमुने घेतल्यानंतर ते अत्यंत विशिष्ट पद्धतीने पॅक करून सीलबंद करण्यात आले आहेत, त्यामुळे प्रक्रियेत कोणतीही गडबड होण्यास वाव नसल्याचे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. आता संभाजीनगरच्या प्रयोगशाळेतून काय अहवाल येतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून त्यानुसार पुढील कायदेशीर पावले उचलली जाणार आहेत. ◀◀ पान ३ वर

# बीडमध्ये १५ जून रोजी वकीलांची निदर्शने

**अनुसूचित जातीच्या वकील बांधवांनी सहभागी व्हावे**

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचे निश्चित केले आहे, हे अनुसूचित जातीमध्ये फूट पाडून आरक्षण संपवण्याचे षडयंत्र आहे. याला विरोध करण्यासाठी बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या वकीलांच्या वतीने बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर (दि.१५ जून) रोजी दुपारी १:३० वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत. तरी बीड जिल्ह्यातील वकील बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स फोरम बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातीच्या सर्व घटकांना शासकी व शैक्षणिक क्षेत्रात आरक्षणाचा अधिकार मिळवून दिला होता. या समाजाला १३ टक्के आरक्षण देऊन समान संधी देण्यात आली होती. यामुळे बऱ्याच प्रमाणात अनुसूचित जातीला याचा फायदा झाला.त्यामुळे समाज प्रगती करू लागला, जो शिक्षणात मागे राहिला ज्यांनी गुलामगिरी सोडली नाही तो घटक मागे राहिला.ज्या जातीवादी शक्तीने आरक्षणाला विरोध केला, तीच शक्ती आज सत्तेत आहे. काही मनुवादी चमच्यांना हाताशी धरून अनुसूचित जातीमध्ये फूट पाडण्यासाठी आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचे व सर्वच आरक्षण संपवण्याचे षडयंत्र सरकार करत आहे. या धोरणाला विरोध करण्यासाठी या निदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व अनुसूचित जातीच्या वकिलांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स फोरम बीडच्या वतीने करण्यात आले आहे.

# कलेक्टर साहेब आता तरी पाणीसाठा राखीव ठेवा - प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी

अल निनोमुळे यंदाचा पावसाळा दुष्काळ घेऊन येईल की अतिवृष्टी होईल असा अंदाज हवामान खात्यासह पंजाब डक करीत आहेत. जिल्ह्यात अनेक छोटी मोठी धरणे आटली आहेत तर कुठे मृतसाठापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे याचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय कलेक्टर साहेब यांनी पाटबंधारे खात्याशी संबंध साधून पाणीसाठ्याची चौकशी करावी. पाऊस लांबलाच तर पाण्याचे नियोजन करून धरणात उरलेला पाणीसाठा जतन करावा अशी मागणी प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

शासनाने पेयजल योजनेवर करोडो रुपये खर्च केले आहेत जिल्ह्यात शेतीसाठी बांधलेली धरणे आता सर्रास पिण्याच्या पाण्याच्या योजनासाठी जवळपास ५०% वापरली जात आहेत, अनेक पेयजल योजनेच्या विहिरीत पाणीसाठा संपत आलेला आहे, नागरिकांना, जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक गावात भटकंती करावी लागत आहे. मागच्या वर्षी मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे जवळपास सगळी धरणे भरली होती यावर्षी मात्र अवकाळी पाऊस कमी पडल्यामुळे धरणातील पाणीसाठा कमी झाला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कलेक्टर साहेबांनी पाण्याचे नियोजनासाठी प्रयत्न करावेत व धरणातील शिल्लक पाणीसाठा राखीव ठेवावा अशी मागणी किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी केली आहे.

# वडवणीत अवैध मटका-जुगाराला ऊत; कारवाईची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सुरू असलेल्या अवैध मटका-जुगार व्यवसायाविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव गणपतराव सावंत यांनी केली आहे. याबाबत त्यांनी काल दि. ९ जुन रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की,वडवणी पोलीस यांच्या आशिर्वादामुळे वडवणी शहर व ग्रामीण भागात कल्याण, मेन बाजार, श्रीदेवी नाईट, श्रीदेवी डे, मिलन नाईट, मिलन डे आदी विविध नावांनी मटका-जुगाराचे प्रकार खुलेआम सुरू असून, अनेक वर्षांपासून हा व्यवसाय राजरोसपणे सुरू आहे. या अवैध व्यवसायामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून अनेक युवक व कुटुंबे आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच, शहरासह तालुक्यातील अनेक चौकांमध्ये मटका-जुगाराचे अड्डे सुरू असल्याचे नमूद करत संबंधित बुकी व चालकांवर तात्काळ कारवाई करून हा अवैध व्यवसाय बंद करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन अवैध मटका-जुगाराविरोधात मोहीम राबवावी, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही महादेव सावंत यांनी दिला आहे.या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# कागदावरच विकास, अधिकाऱ्यांचे साटेलोटे!

**बाळेवाडीत झालेल्या बोगस कामांच्या चौकशीसाठी ग्रामस्थांचे आमरण उपोषण**

आष्टी । प्रतिनिधी

शासनाकडून गावाच्या विकासासाठी लाखो रुपयांचा निधी येतो,मात्र हा निधी गावच्या विकासासाठी नव्हे तर धनदांडग्यांच्या आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या खिशासाठीच वापरला जात असल्याचा प्रकार आष्टी तालुक्यातील बाळेवाडी येथे उघडकीस आला आहे.स्मशानभूमी व जिल्हा परिषद शाळेतील पेव्हिंग ब्लॉक आणि वृक्षारोपण योजनेतील बोगस कामांची सखोल चौकशी व्हावी या मागणीसाठी बाळेवाडी येथील ग्रामस्थांनी सोमवार दि.८ जून २०२६ पासून आष्टी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.




प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि आश्वासनांची खैरात

मिळालेल्या माहितीनुसार, बाळेवाडी येथे झालेल्या स्मशानभूमीतील पेव्हिंग ब्लॉक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पेव्हिंग ब्लॉक आणि वृक्षारोपण व संगोपन या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.यासंदर्भात २१ मे २०२६ रोजी ग्रामस्थांनी आष्टी पंचायत समितीकडे पुराव्यानिशी लेखी तक्रार दाखल केली होती.या तक्रारीची दखल घेत प्रशासनाने ८ दिवसांत चौकशी समिती नेमून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पडताळणी करण्याचे व अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र, प्रत्यक्षात पंचायत समितीच्या एकाही कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने बाळेवाडीकडे फिरकण्याची तसदी घेतली नाही. धक्कादायक बाब म्हणजे,या कामांची चौकशी प्रलंबित असतानाच व अधिकाऱ्यांनी कोणतीही ◀◀ पान ३ वर

# वडवणीत शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यासाठी एकदा नव्हे दोनदा रांगेत उभे केले

**तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे ढिसाळ नियोजन**

वडवणी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना शासनाने कृषी कार्यालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन केलेल्या शेतकऱ्यांना प्रथम प्राधान्य यादीनुसार ७५ किलो प्रति हेक्टर मोफत सोयाबीन बियाणे घेण्यासाठी काल तालुका कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांनी गर्दी करून रांगा लावून कागदपत्रे जमा करून टोकन घेतले परत शेतकऱ्यांना बियाणे घेण्यासाठी कृषी दुकानावर रांगेत उभा राहावे लागले यामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी झालेली होती.



सध्या खरीप हंगाम लागवड, पेरणी सुरू झालेली असून यामध्ये वडवणी तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी शेतीच्या पेरणीसाठी व लागवडीसाठी बी बियाणे खते खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत कृषी सेवा केंद्रावर गर्दी केल्याचे पहावयास मिळाले यामध्ये शेतकरी बळीराजाला आधार म्हणून राज्य शासनाने महाडीबीटी द्वारे बी बियाणे मोफत मिळण्याची योजना सुरू केलेली असून त्यामध्ये तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केलेली होती यामध्ये प्रथम प्राधान्य क्रमानुसार शेतकऱ्यांची निवड यादी जाहीर करण्यात आलेली असून यामध्ये काल सोमवार रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाणे घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली यामध्ये कृषी कार्यालयाने कागदपत्राची तपासणी करून शेतकऱ्यांना बियाणे कृषी केंद्रावरून घेऊन जाण्यासाठी टोकन दिले यामध्ये नंतर शेतकऱ्यांना ◀◀ पान ३ वर

# राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ पुरस्कार सोहळ्याचे अहिल्यानगर येथे आष्टी तालुका युवा पत्रकार संघातर्फे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, आष्टी, जि. बीड यांच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्र आयकॉन्स २०२६ पुरस्कार वितरण सोहळ्याचे भव्य आयोजन अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व जनहिताचे कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान या सोहळ्यात करण्यात येणार असून, राज्यभरातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

हा पुरस्कार सोहळा शनिवार, दि. २० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल मेघनंद लॉन्स अँड रेस्टॉरंट, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार लोकनेते, मराठवाडा भूषण सुरेश (आण्णा) धस भूषविणार आहेत.




या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार संग्राम (भैय्या) जगताप (अहिल्यानगर), आमदार काशिनाथ दाते (पारनेर), आमदार अक्षय (दादा) कर्डिले (राहुरी), श्रीमती ज्योतीताई गाडे (महापौर, अहिल्यानगर), पोपटराव पवार (पद्मश्री, कार्याध्यक्ष आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती, महाराष्ट्र राज्य), ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज (श्री क्षेत्र गणेश गड संस्थान, नागतळा), धनंजय जाधव (उपमहापौर, अहिल्यानगर) तसेच संपत बारस्कर (ज्येष्ठ नगरसेवक, अहिल्यानगर) उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून

श्रीमती सुधाताई कांकरिया (समाजसेविका व प्रसिद्ध नेत्रतज्ञ, अहिल्यानगर,अनिल लगड (अध्यक्ष, पत्रकार संघ अहिल्यानगर), मनसुरभाई शेख (राज्य कोषाध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद), श्रीमती रेश्माताई आठरे (महिला जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी अजित पवार गट, अहिल्यानगर),श्रीमती रेश्माताई जगताप (सातारा जिल्हा संपर्कप्रमुख, शिवसेना शिंदे गट),श्रीमती डॉ. स्वातीताई जाधव (शिवसेना महिला आघाडी शिंदे गट, जिल्हाप्रमुख, अहिल्यानगर,गणेश मोकाशी (राज्य उपाध्यक्ष, आ.भा.म.प.परिषद, महाराष्ट्र), श्रीमती सुवर्णाताई गि-हे (उपविभागीय अध्यक्ष जिजाऊ ब्रिगेड महाराष्ट्र) आणि श्रीमती रेणुकाताई वराडे (अध्यक्षा, रणरागिनी महिला ग्रुप, नगर जिल्हा), ) यांचाही विशेष सहभाग राहणार आहे. यंदाचे वर्ष हे या पुरस्कार सोहळ्याचे आठवे वर्ष असून, गेल्या सात वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्काराने गौरविण्याची ◀◀ पान ३ वर

# बीड येथे शिवसेना सचिव संजय मोरे यांचे उत्स्फूर्त स्वागत

बीड । प्रतिनिधी

शिवसेना सचिव संजय मोरे साहेब बीड येथे आले असता जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

यावेळी मोहम्मद अझरुद्दीन उर्फ ए.एस. गोलू यांची शिवसेना अल्पसंख्याक विभाग, बीड जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा माननीय संजय भाऊ मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच इरफान कुरेशी आणि सरफराज काजी यांचीही निवड झाल्याबद्दल त्यांचा माननीय संजय मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिवसेना अल्पसंख्याक कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य - समीर काजी साहेब; शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप; शिवसेना



जिल्हाप्रमुख सचिन मुळूक; शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर; गेवराई तालुकाप्रमुख उद्धव मडके; तसेच असंख्य शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk